# मोरस मराठी कविता दशावतार

मोरस मराठी कविता दशावतार

[ प्रातिनिधिक काव्य संग्रह ]

संपादन : प्र. श्री. नेरुरकर

# मोरस मराठी कविता दशावतार

**मोरस मराठी कविता दशावतार**

[**प्रातिनिधिक काव्य संग्रह**]

संपादन प्र. श्री. नेरुरकर

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ
मंत्रालय-मुंबई-४०००३२

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती** : १ नोव्हेंबर १९८४.

**प्रकाशक** : सूर्यकांत देशमुख

सचिव

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ

मंत्रालय-मुंबई ४०० ०३२

**© प्रथमावृत्ती** : प्रकाशकाधीन

**मुद्रक** : चिंतामणी प्रिंटिंग प्रेस

**ऑफिस** : २०४ महावीर अपार्टमेंट नं. २

जे. पी. रोड, अंधेरी (पश्चिम)

मुंबई-४०००५७

टे. नं. ५७ ८१ १३

*Price* : *Four Dollars*

**किंमत २० रुपये**

## अनुक्रमणिका

# निवेदन

हिंदी महासागरात भारतापासून हजारो मैल दूर मॉरिशस बेट इतर द्वीपसमूहांसह गेली असंख्य वर्षे अस्तित्वात आहे. चारशे वर्षांपूर्वी या मॉरिशस बेटावर फक्त डोडो नावाचा पक्षी इतर पशुपक्ष्यांसह रहात असे. सोळाव्या-सतराव्या शतकापासून पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच या साम्राज्यवाद्यांच्या वासाहतिक स्पर्धा सुरू झाल्या आणि मॉरिशस बेटावर या वसाहतवाद्यांकडून त्यांनी अगोदरच ज्या देशात सत्तास्पर्धा सुरू केल्या होत्या त्या देशांतील माणसे वेठबिगार मजूर म्हणून नेली. फ्रेंच व इंग्रज यांच्यामध्ये सत्तास्पर्धा भारतात सुरू झाली व हिंदी महासागरातील मॉरिशस बेट ऊसाचे बेट म्हणून त्यांनी निवडले. त्याच काळात पहाडांच्या व नद्यांच्या या निसर्गसुंदर बेटावर जमीन कसण्यासाठी भारतातील बिहार, तामीळनाडू, आंध्र व महाराष्ट्रातून बोटी भरभरून वेठबिगार मजूर स्त्री-पुरुष, मुले, मॉरिशस बेटावर नेण्यात आली. आज १९८४ साली भारतीय लोकांना या बेटावर स्थलांतरित म्हणून जाऊन दीडशे वर्षे पुरी होत आहेत. या बेटावर आजचे मॉरिशस देशाचे तरुण व धडाडीचे पंतप्रधान अनिरुद्ध जगन्नाथ यांच्या नेतृत्त्वाखाली—मॉरिशस—१५० वर्षे भारतीय स्थलांतरितांची हे वर्ष १ ऑक्टोबर १९८४ पासून ३१ मे १९८५ पर्यंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरे होत आहे.

मॉरिशस बेटावर इतर भारतीय भाषिकांबरोबर मराठी भाषिक समाज गेली दिडशे वर्षे वास्तव्य करून आहे. आज मॉरिशस बेटावरील मराठी समाजाची लोकसंख्या पन्नास हजाराच्या जवळपास आहे. या मराठी लोकांनी आजवर मॉरिशस बेटावर आपली मराठी भाषा, महाराष्ट्राची लोकसंस्कृती, उत्सव परंपरा व दशावतारासारखे लोकनाट्य टिकवून ठेवले आहे. इ. स. १९६४ सालापासून मॉरिशस देशाच्या शिक्षणक्रमामध्ये मराठी भाषेच्या अभ्यासाचा समावेश झाला आहे. आज मॉरिशसमध्ये सुमारे सत्तर मराठी भाषेच्या शाळा असून शंभराच्यावर मराठी शिक्षक-शिक्षिका मराठी भाषेच्या अध्यापनाचे काम करतात. मॉरिशसचे भूतपूर्व पंतप्रधान व विद्यमान गर्व्हनर जनरल माननीय डॉ. सर शिवूसागर रामगुलाम यांच्या कारकिर्दीत मॉरिशमधील पौर्वात्य विद्यांचा अभ्यास व संशोधन करणारी 'महात्मा गांधी संस्था' १९७५ साली स्थापन झाली. भारताच्या पंतप्रधान माननीय इंदिरा गांधी यांनी या संस्थेचे उद्घाटन केले होते. 'महात्मा गांधी संस्थे'त गेली काही वर्षे मराठी भाषा व पाठ्यपुस्तक मंडळाचे कार्यालय मॉरिशस बेटावरील मराठी भाषेच्या व साहित्याच्या विकासाचे काम करीत आहे. धर्मा गोविंद, देवजी पडीया, संजय आनंद, श्रीमती दयाबाय बाबाजी, पुष्पाजी नारू, सौ. रत्नाबाय बापू अशी मराठी अध्यापक व लेखक मंडळी या विभागात अधिकार पदावर आहेत. **'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन'** ही मॉरिशस बेटावरील मराठी समाजाची प्रातिनिधिक संस्था आहे. महाराष्ट्रामध्येही **'महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळ'** ही संस्था गेले दीड शतक मॉरिशस देशातील भारतीय समाजासाठी महाराष्ट्रात कार्यरत आहे. या मंडळातर्फे मॉरिशसमधील कवी व लेखक धर्मा गोविंद, देवजी पडीया, सदानंद भिवाजी, सदाशिव गोविंद जगताप यांचे 'मोरस मराठी' भाषेतील साहित्य **महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला** उपलब्ध झाले आहे. सदाशिव गोविंद या आज ऐंशी वर्षे वयाच्या गृहस्थांनी आपले आत्मकथन लिहिले आहे. धर्मा गोविंद यांनी 'माहेरी गेली' ही कहाणी लिहिली आहे. देवजी पडीया व सदानंद भिवाजी यांनी एकांकिका व नाटके लिहीली आहेत. शिवाय मॉरिशस बेटावरील दशावताराची मराठी संहिताही मंडळाला प्राप्त झाली आहे. **मॉरिशस—१५० वर्षे भारतीय स्थलांतरितांची**— हे वर्ष साजरे होत असताना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला मॉरिशसमधील या मराठी लेखकमंडळींची पुस्तके प्रकाशित करताना विशेष आनंद होत आहे. 'मोरस मराठी' भाषा ही सुद्धा मूळ मराठी मातृभाषेच्या अस्तित्वाचे एक अभ्यसनीय अंग बनले आहे. अभ्यासकांना ही पुस्तके विशेष उपयुक्त ठरतील असे मला मनःपूर्वक वाटते.

अनुक्रमणिका

**सुरेन्द्र बारलिंगे**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

**४२, यशोधन**

**मुंबई-४०० २०**

**दिनांक १ नोव्हेंबर, १९८४**

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


निवेदन ........ ४

-मोरस मराठी॰ आणि मॉरिशसमधील मराठी भाषिक लेखन ........ ८

बाहु रानी ........ १५

आपला आवडता देश ........ १६

कोठून आवाज येत आहे ........ १८

देशाचे उद्धार ........ १९

गेली सांगून माझी आजी ........ २०

बहिष्कृत ........ २१

Shivaji ........ २२

शिवाजी ........ २३

The Outcast ........ २५

मॉरिशसचे गाणे: ........ २७

एकदा सागरातून उमळून आले मोती ........ २८

दशावताराची कथा प्रारंभ ........ २९

गणपतीची आरती ........ ४७

रामायण कथा प्रारंभ ........ ४८

पाळणा ........ ७७

अमर भूपाळी ........ ७८

आरती दशावताराची ........ ८०

कशी गाऊ तुझी थोरवी ........ ८२

प्रभूचरणी विलिन झाल्या पाकल्या ........ ८३

बंधन ........ ८४

समुद्राच्या काठी झाडाच्या तळी बसलो मी धारा घेऊनी नयनी ........ ८६

दुःखी जीवन ........ ८७

वंदना ........ ८८

आई ........ ८९

बाळ कौतुके ........ ९०

चालतो मी एकटा ........................................................................................................ ९१
माझा देश ............................................................................................................... ९२
इथे पाहिला इतिहास ................................................................................................ ९३
हे इंदिरा गांधी तुला माझा लाख प्रणाम ........................................................................ ९४

## ‘मोरस मराठी’ आणि मॉरिशसमधील मराठी भाषिक लेखन

**‘महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा’चे** अध्यक्ष व माझे स्नेही डॉ.सुरेन्द्र बारलिंगे यांनी मॉरिशस बेटावरील मराठी माणसांची कहाणी माझ्याकडून नीट ऐकून घेतली. मी माझ्या मॉरिशस बेटावरील मुक्कामात लिहिलेली माझी **‘मॉरिशस डायरी’** देखील त्यांनी समजावून घेतली. मॉरिशस बेटावरील मराठमोळ्या माणसांनी गेली दीडशे वर्षे टिकवुन ठेवलेली आपल्या पूर्वजांची मराठी भाषा— तिचा इतिहास डॉ. बारलिंगे यांनी माझ्याकडून ऐकला. मी मॉरिशस बेटावरील वयोवृद्ध, मध्यमवयीन व तरुण पिढीच्या स्त्री—पुरुषांना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेल्या त्यांच्या संभाषणाच्या व त्यांनी गाऊन दाखविलेल्या मराठी गीतांच्या व लोकगीतांच्या माझ्याकडील ध्वनिफिती डॉ. बारलिंगे यांनी अभ्यासपूर्वक ऐकल्या. आणि मॉरिशस बेटावरील आजवर टिकून राहिलेली मराठी भाषा व तेथील मराठी मंडळींनी बेटावरच्या आपल्या स्वतंत्र राष्ट्रातील आंतरराष्ट्रीय बहुभाषांच्या वातावरणात जोपासलेली आपली मराठी भाषा,—तिला नंतर जे ‘मोरस मराठी’ भाषेचे स्वरूप प्राप्त झाले—ती सुद्धा डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांनी आपलीच मराठी भाषा म्हणून **‘साहित्य संस्कृती मंडळा’** साठी स्वीकारली, हे मी **‘मोरस मराठी भाषे’**चे महद्भाग्य समजतो. त्याबद्दल डॉ. बारलिंगे यांना ‘मॉरिशस बेटावरील **‘मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन’**च्या वतीने व आमच्या मुंबईतील **‘महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळा’**च्या मी वतीने धन्यवाद देतो.

१९६७ सालच्या सप्टेंबर महिन्यातच मी मॉरिशस बेटावर पहिल्यांदा पाऊल टाकले. महाराष्ट्रातील थोर व कर्तबगार सर्कस महर्षी कै. नारायणराव वालावलकर यांच्या ‘धी ग्रेट रॉयल सर्कस’ बरोबर पूर्व आफ्रिका खंडात एक पत्रकार व लेखक म्हणून प्रवास करण्याची संधी नारायणरावांनी मला दिली होती. मोंबासाहून एका खास डच महासागरी जहाजातून आठ नऊ दिवस हिंदी महासागरावर तरंगत मी एका संध्याकाळी मॉरिशस बेटाच्या पोर्ट लुईस या बंदरात येऊन थडकलो होतो. मग आमचा सर्कसचा तळ मॉरिशस बेटावरील कॉरोमॉडेल या स्थळावर पडला होता. गंमत म्हणजे पहिल्या आठदहा दिवसात सगळे मॉरिशस ‘धी ग्रेट रॉयल सर्कस’च्या चार खांबी भव्य तंबूत येऊन लोटत होते आणि मी ते जवळून निरखून पहात होतो. मग हळूहळू मॉरिशसच्या लोकजीवनात मी रस घेऊ लागलो. मॉरिशसच्या पंतप्रधानांपासून तो मंत्रीमंडळ आणि संसद सदस्यांपर्यंत मला माणसे भेटत गेली. मी त्यांना भेटत राहिलो. त्यावेळचे दोन संसद सदस्य माननीय शिवा बापू व गणू गंगाराम मला भेटले आणि मॉरिशस बेटावरील मराठी मंडळींशी माझा जवळचा व जिव्हाळ्याचा ऋणानुबंध जडत गेला. तेव्हाच मला मॉरिशस बेटावरील चारी पहाडा दिशांना विखुरलेल्या व ऊस-शेतमळ्यात मजूर म्हणून काम करणाऱ्या व अन्य व्यवसायी मराठी माणसांना प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची, त्यांचे जीवन समजून घेण्याची संधी गणू गंगाराम व शिवा बापू या बेटावरील ज्येष्ठ नेत्यांनी व समाजकार्यकर्त्यांनी प्राप्त करून दिली. मॉरिशस बेटावरील मराठी समाजात जन्माला आलेला व ज्याचा वंशज बाबल्या सावंत हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी परिसरातील माणगाव भागातून एक बेठबिगार मजूर म्हणून दीडशे वर्षांपूर्वी या बेटावर गेलेला—तो मॉरिशसमधील नामवंत लेखक, विचारवंत, कथा-कादंबरीकार व इतिहासाचा शिक्षक—आनंद सावंत मल्लू या बेटावर मला भेटला. ‘मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन’चा धडाडीचा तरूण कार्यकर्ता, त्याचा भाऊ विरजानंद मल्लू व सगळे मल्लू कुटुंब, त्यांची आई सयाबाई, त्यांचे वडील, त्यांचा परिवार मला भेटला. मॉरिशस बेटावरील माझ्या पहिल्या अडीच महिन्यांच्या मुक्कामात मॉरिशसमधील भारतीय समाजाची मी बरीच माहिती प्रत्यक्ष भेटीगाठीतून, संवादातून व निरीक्षण व अभ्यासातून गोळा केली. माझी **‘मॉरिशस डायरी’** अद्ययावत लिहिली. मग मुंबईला परत आल्यावर ‘महाराष्ट्र टाईम्स’ मध्ये एक दीर्घ लेखमाला लिहून या स्वप्ननिळ्या बेटावरची मराठी माणसांची कहाणी मी महाराष्ट्राला सांगितली.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रीय माणसांना ती कहाणी वाचून प्रथमच मॉरिशस बेटावरील मराठी माणसांचे जीवन समग्र व सुस्पष्ट असे आकलन झाले. नंतर **'महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळा'ची** स्थापना मुंबईत झाली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे त्यावेळचे संचालक, संघटक व कार्यकर्ते कै. वासुदेवराव भट यांचे मला मोठे सहाय्य झाले.

याच माझ्या पहिल्या भेटीत एके दिवशी सर्कशीत माझा पत्ता काढीत धर्मा गोविंद हा मराठी भाषेचा शिक्षक मला भेटायला आला. उंच, देहाने भरलेला, कष्टकरी समाजाच्या सर्व खुणा अंगावर प्रकट करणारा, लालसर वर्ण पण देखणा सतेज चेहरा, डोळे पाणीदार व भावुक, मॉरिशस बेटावरील पाश्चात्य पद्धतीप्रमाणे त्याने सूट-बूट घातलेला, भव्य कपाळ आणि डोक्यावर काळेभोर केस व्यवस्थित विंचरलेले. शिवाय तो चांगले मोरस मराठी बोलत होता. त्याने बेटावरील मराठी शिक्षणाची व शिक्षकांची परिस्थिती मला विशद करून सांगितली. आपल्या मराठी भाषेत लिहिलेल्या कविता व कथा त्याने मला वाचायला दिल्या. मी जणू कुणी त्याचा वर्षानुवर्षे हरवलेला नातेवाईकच त्याला भेटलो होतो. धर्मा गोविंद बोबेसिन सारख्या शहरापासून (जिथे आमच्या सर्कसचा तळ पडला होता) दूर खेड्यात रहात होता. त्याच्या बोलण्या-चालण्या वागण्यातून त्याने मला एक विलक्षण चटका लावला. मलाही वाटू लागले की, माझाही कुणी युगानुयुगे फारकत झालेला महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठी साहित्य यांचा वंशज पुन्हा मला अद्‌भुतपणे या बेटावर भेटला. 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये मी लिहिलेल्या लेखमालेत धर्मा गोविंदच्या मॉरिशस देशाला उद्देशून लिहिलेल्या मोरस मराठी कविता या आवर्जून समाविष्ट केल्या होत्या. मुंबई आकाशवाणीवर मी मॉरिशस भेटीवर तीन व्याख्यानांची माला गुंफली. त्यावेळी धर्मा गोविंदच्या कविता मी पेश केल्या व श्रोत्यांवर त्यांचा एक भावनिक प्रभाव पडलेला मला आढळून आला.

इ. स. १९७९ साली महाराष्ट्र राज्य सरकारच्या आमंत्रणावरून मॉरिशस बेटावरील मराठी मंडळीचे एक प्रतिनिधी मंडळ श्री. प्रेम लक्ष्मण यांच्या नेतृत्वाखाली मुंबईला आले. त्या मंडळाच्या प्रतिनिधीचे मुंबई, पुणे व अन्य ठिकाणी भरघोस स्वागत झाले. महाराष्ट्र राज्याने मॉरिशसमधील मध्यम परिस्थितीतील मराठी मुलामुलींना महाराष्ट्रात येऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी सोयी-सवलती उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. या प्रतिनिधी मंडळाबरोबर देवजी पडीया हा मॉरिशमधील नाटककार, कवी व मराठी भाषेचा शिक्षक आलेला होता. दरवर्षी 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन' तर्फे मॉरिशस बेटावर १ मे रोजी **'महाराष्ट्र दिन व छत्रपती शिवाजी महाराज उत्सव'** राष्ट्रीय पातळीवर साजरा केला जातो. इ. स. १९८० साली १ मे रोजी साजरा होणाऱ्या या समारंभाचा प्रमुख पाहुणा म्हणून 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन' ने मला मॉरिशस बेटावर आमंत्रित केले. त्याप्रमाणे मी या दुसऱ्या मॉरिशस भेटीत बेटावर दहा आठवडे मुक्काम केला आणि विशेषच सखोल व व्यापक अशी मराठी समाजाची माहिती मी मराठी माणसाच्या वस्तीत घरोघरी जाऊन मिळविली. माझी ही संशोधनात्मक कामगिरी सफल व्हावी म्हणून 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन'ने मला अव्याहत सर्व प्रकारचे सहाय्य दिले. शिवाय मॉरिशसनमधील 'महात्मा गांधी संस्थे'त तेथील अधिकारी वर्गाने व 'मॉरिशस लेखक संघा'चे कार्यवाह प्रा. आनंद सावंत मल्लू यांच्या मार्गदर्शनाने मी महाराष्ट्रातून मॉरिशस बेटावरच स्थलांतरित झालेल्या मराठी माणसांची राखून ठेवलेली इंग्रजी अमदानीतील बरीचशी दप्तरे धुंडाळली. त्यांचा अभ्यास केला, विस्तृत टीकाटिप्पणी केल्या. 'मॉरिशस देशा' वरील माझ्या आगामी ग्रंथात त्याबद्दल सविस्तर मी लिहिणारच आहे. या माझ्या दुसऱ्या मुक्कामात मॉरिशस बेटावरील मराठी भाषिक लेखक, कवी, लोकनाट्यकार, लोककलाकार मला भेटले व मराठी माणसांनी या बेटावर जोपासून ठेवलेल्या 'दशावतारी' लोककलेची मूळ संहिता मला मिळाली. तिचे उपासक असे जुने नवे कलाकार मला भेटले. धर्मा गोविंद, देवजी पडीया, सदानंद भिवाजी,

अनुक्रमणिका

पुष्पाजी नारू, बाळशेट गोपाळ, सौ. रत्नाबाय बापू, सदाशिव गोविंद जगताप, शिवाजी सोनीया, रास माल्लू, रूपसेन देवजी, चंत्रसेन बाप्पू नि इतर लेखक व कलावंत मंडळी मला भेटली.

'माहेरी गेली' ही आपली एक जाडजूड वहीत रेखीव देखण्या अक्षरात मराठीत लिहिलेली मोरस मराठी कहाणी धर्मा गोविंद यांनी मला वाचायला दिली. धर्मा गोविंद आता पंडित धर्मा गोविंद झाले आहेत. 'महात्मा गांधी संस्थे'तील 'मराठी भाषा पाठ्यपुस्तक मंडळ' विभागात ते काम करतात. मॉरिशस बेटावर ते भारतीय समाजातील धार्मिक विधी व लग्न सोहळे अधिकृत प्रशिक्षित धर्मपंडित म्हणून पार पाडतात. पन्नाशीत आलेले धर्मा गोविंद यांचे पूर्वज महाराष्ट्रातून शंभर दीडशे वर्षांपूर्वी या बेटावर गेले. काही आठदहा वर्षांपूर्वी महाराष्ट्र सरकारने मॉरिशस बेटावरील मराठी भाषेच्या शिक्षकांना पनवेल येथील 'प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालया'त मराठी शिक्षक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली होती. त्यावेळी धर्मा गोविंद, देवजी पडीया, सदानंद भिवाजी व अन्य शिक्षक-शिक्षिका महाराष्ट्रात आल्या होत्या. आपल्या पूर्वजांची भूमी त्यांनी भक्तिभावाने पाहिली. आज मॉरिशस बेटावर सरकारमान्य व खासगीरित्या चालविलेल्या सत्तर मराठी शाळा असून सुमारे शंभर शिक्षक-शिक्षिका त्या शाळांतून अध्यापक म्हणून काम करतात. इ. स. १९६४ सालापासून मॉरिशस बेटावरील प्राथमिक शिक्षणक्रमात मराठी भाषेचा, हिंदी, तेलगू, तामीळ, भोजपुरी या भारतीय भाषांबरोबर समावेश करण्यात आला. आता गेली पंधरा वर्षे मॉरिशस बेटावर 'महाराष्ट्र साहित्य परिषद' स्थापन झाली असून तिच्यातर्फे शनिवारी व रविवारी मराठी भाषेच्या विविध उच्च परीक्षांसाठी खास वर्ग घेतले जातात. मॉरिशस आकाशवाणी व दूरदर्शनवर मराठी भाषेचे कार्यक्रम सादर होतात. मॉरिशस बेटावरील मोरस मराठी भाषा, त्या भाषेतील बोलणे व लिहिणे, हे एक भाषावास्तव आहे.

'माहेरी गेली' ही धर्मा गोविंद यांची कहाणी मॉरिशस बेटावरील पूर्वेकडील अशा एका दाट व अरण्यग्रस्त काळ्या नदीच्या परिसरात पडते, की ती स्थलकाळपावे या संदर्भात समजून घेण्यासाठी मॉरिशस बेटाची भौगोलिक रचना सुबुद्ध वाचकाने समजून घेणे आवश्यक आहे. 'तामारिन बे' किंवा तामारीन किंवा तामार खेडेगावात व ल मोर्ने, शामारेल, बे ज्यूकँप, या घनदाट व हिंदी महासागराला रूद्रभीषणपणे भिडलेल्या पहाडी भागात धर्मा गोविंद यांच्या कथेतील मराठी पात्रे वावरतात. मराठी माणसे प्रथम बोटी भरभरून जेव्हा ब्रिटिश दलालांनी मॉरिशस बेटावर नेली व त्यांना राहण्यासाठी बेटावरील स्थळांची निवड करण्याची संधी दिली तेव्हा मराठी मजुरांनी 'काळी नदी' व तिचा पहाडी प्रदेश पसंत केला. त्याचे एक कारण म्हणजे महाराष्ट्रातून आलेल्या या मराठी मंडळींना हा पहाडी विभाग सह्याद्री पर्वतांच्या व भीमाकृष्णागोदा नदीच्या प्रदेशासारखा थेट वाटला. आज या काळ्या नदीच्या प्रदेशात त्यावेळचे मराठी समाजाचे नेते व द्रष्टे कै. लक्ष्मणराव व सौ. भागीरथीबाई पवार यांनी बांधलेले 'विठोबा रखुमाई'चे देऊळ ऐंशी वर्षे उभे आहे. धर्मा गोविंद या परिसरातील मराठी माणसांच्या जीवनाशी 'जो होय एक सुखदु:खपणी गडी तो' असे समरस झालेले आहेत. या बेटावरील कष्टकरी, कामकरी खेडूत मराठी स्त्रीपुरुषांची, तरुण-तरुणींची अद्भुत कहाणी धर्मा गोविंद यांनी आपल्या अद्भुत व अभिजात मोरस मराठी भाषेत सजीव साकार केली आहे. 'माहेरी गेली' या कथेतील काहीसे गूढ, अद्भुत व अमूर्त वातावरण धर्मा गोविंद थेट नेऊन मानवी सुखदु:खाच्या आंतरिक पण अनाकलनीय वास्तवाला विलक्षण प्रत्ययकारिकतेने व कलात्मकतेने नेऊन भिडवितात. हजारो मैलांवरच्या हिंदी महासागराच्या पोटातून कधीकाळी प्रचंड भूकंप होऊन जलपृष्ठावर आलेल्या मॉरिशस बेट नावाच्या इवल्याशा भूखंडावर वावरणारी ही कष्टकरी माणसे एका आपल्या भूत, वर्तमान व भविष्यकालीन भवितव्याशी जशी निगडित आहेत तशीच एका विशिष्ट समाजरचनेतही त्यांचे सामाजिक, मानसिक व आत्मिक पोषण झाले आहे. तशातही जातपात टिकून राहते

अनुक्रमणिका

पण तिला छेद मिळत जातो. धर्मा गोविंद यांनी केलेला मोरस मराठी समाजातील लोकगीतांचा वापर त्यांच्या कहाणीला उत्कट भावनिक परिमाणे प्राप्त करून देतो. खरोखर डॉ.सुरेंद्र बारलिंगे यांनी ही कहाणी 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळा'तर्फे प्रकाशित करून मोरस मराठी भाषेला व मोरस मराठी माणसाला सांस्कृतिक व साहित्यिक उत्थापन दिले आहे.

मोरस मराठी लेखनाचे स्वरूप ठरविताना मॉरिशस बेटावर प्रचलित असलेल्या बेटावरील मराठी माणसांच्या वेगवेगळ्या वस्तींतील मराठी बोलींच्या लकबी व तऱ्हा अभ्यासकाला प्रत्यक्ष श्रवणमाध्यमातून लक्षात घ्याव्या लागतील. मोरस मराठी भाषेचे एक वैशिष्ट्य नेहमीच ठळकपणे जाणवते. ते म्हणजे जुन्या पिढीतील वयस्कर स्त्रीपुरुष मंडळी जी मोरस मराठी भाषा बोलतात व लिहीतात त्या मराठीचा ढंग शतकापूर्वीच्या महाराष्ट्रातील कामकरी, कष्टकरी, शेतकरी व कुणबाऊ लोकांकडून बोलल्या जाणाऱ्या मराठमोळ लोकबोलीचाच टिकून राहिला आहे. या उलट मॉरिशस बेटावरील मराठी समाजातील नव्या पिढींचे मराठी भाषेतील बोलणे काहीसे इंग्रजाळलेल्या वा फ्रेंचाळलेल्या मिशनरी मराठी पद्धतीचे अमराठी उच्चारणातून होत आहे की काय असे क्वचित वाटत रहाते. एक म्हणजे मोरस मराठी भाषेच्या शाळा बेटावर चारी दिशांना मराठी भाषेच्या अध्यापनाचे व प्रसाराचे कार्य जिद्दीने करताहेत. विशेषत: ध्वनिफितीच्या माध्यमातून आधुनिक मराठी गीते, नाट्यगीते, कविता, पोवाडे, अभंग, ओव्या, मराठी कुटुंबांतून मुलामुलींच्या कानावर वारंवार येतात. मधून मधून मॉरीशस दूरदर्शनवर व तेथील चित्रपटगृहातून मराठी चित्रपटही मराठी मंडळींना बेटावर पहायला मिळतात. शिवाय आकाशवाणीतून मराठी भाषा व मराठी गाणीही मराठी मंडळी ऐकतच असतात. तरीपण आधुनिक मराठी भाषेचा मोठा लक्षणीय प्रभाव मोरस मराठी माणसाच्या बोलण्या-लिहिण्यावर पडला आहे असे म्हणवत नाही. आज जुनी अस्सल मराठी भाषा मॉरिशस बेटावर टिकून राहिली आहे ती तेथील मराठी आयाबायांनी स्मृतीत व ओठावर जपून ठेवलेल्या मराठी लोकगीतांतून व लोककथांतून असे ठामपणे म्हणता येईल. अलिकडेच 'मॉरीशस मराठी मंडळी फेडरेशन'ने 'महात्मा गांधी संस्थे'तील पौर्वात्य भाषांच्या अभ्यासदालनाच्या सहकार्याने मॉरीशस बेटावर दऱ्याखोऱ्यांतील खेड्यापाड्यांतून मराठी माणसांकडून गाईल्या जाणाऱ्या लोकगीतांची श्रवणसुंदर ध्वनिफीत बेटावर प्रसृत केली आहे. या संदर्भात ऑक्टोबर १९८२ मध्ये मॉरीशस विद्यापीठातर्फे भरलेल्या Language Issue in Mauritius या सात दिवसांच्या राष्ट्रीय परिसंवादात, मॉरीशस लेखक संघाचे कार्यवाह व बेटावरील विख्यात कवी, कादंबरीकार, इतिहासकार व भाषा अभ्यासक प्रा. **आनंद सावंत मल्लू** यानी The Role of Marathi Language in Multi-Cultural Mauritius हा आपला शोधनिबंध वाचला होता. **'लोक परंपरा'** हा विषय चर्चिताना ते लिहीतात,

In Mauritius, Marathi culture as part of Indian culture, liberal and tolerant by nature, has remained essentially conservative. It has contributed to Mauritian culture while borrowing from and incorporating strands of the best from Indian. Western and Mauritian cultures. It has adapted itself to changing circumstances, keeping open its door to outside influences while preserving intact its distinct indentity. The strength of the Marathi culture has ensured the permanence of the Marathi language in Mauritius. The Marathi folk literature and folklore are extremely rich. Yet no academic study has even been made, no inventory, no attempt at preserving or storing the folklore has been undertaken by our academic or educational institutions. The Mahatma Gandhi Institute and Marathi Federation are now engaged in recording the folklore with a view to preserving and developing it. Mauritius would be

अनुक्रमणिका

surprised to discover the wealth of cultural heritage which lies buried around the coastal and mountaneous regions of Mauritius, echoing with the flok songs and music which accompany every ceremonial immersion of Ganapati. This is an urgent national task

प्रत्यक्ष मॉरीशस बेटावरील आजवर टिकून राहिलेल्या मराठी भाषेतील लोकसाहित्याचा विचार मांडताना प्रा.आनंद सावंत मल्लू लिहितात,

There is the distinct **Konkan** music and rhythm, coming alive in the homes and on festival occassions. The Common musical instruments are the taa (टाळ), t e mridang, the dholak, peti (harmonium), veena, leghium (लेझीम) (sticks), kartal (cymbals). Traditional songs gave inspiration to the new songs and adaptations made by local people who find in the language a creative medium for self-expression...... There are those who speciallise in bhajans, others in kirtans, others in laoni (love lyrics), in abhang (devotional songs), in bhupali (morning prayers), in bharud. The popular folk song or "Lokgheet" is extremely rich and varied. These include among others, lullabies, festival songs, ritual songs, forest songs, boat songs, harvest songs, sung by men and women. They are the creations of ordinary people who pour out their hopes and fears, dreams and desires in a true democratic spirit. The Marathi folk tales are uncommonly rich drawing back from the ancient traditions of Sanskrit literature-the common Indian heritage. Many of those songs reverberate with the echoes of the ancestral homeland, the konkan hills, mountains, forests and coastline. But the decor is local, the Chameral and Black River Range or Sept Cescades. The girls, the women and village folk join in the chorus and the steps move and with the dances, the past comes back alive, meaningful, in all its spiendour and vitality. The latent creative energies are released in an explosion of ecstacy. The baby is lulled to sleep to the tune of the 'Angai geet' songs. He grows up intoning the Marathi songs from the home, the elders, the local Marathi Pathashala or from the Radio and television.

१९८४ च्या नोव्हेंबर महिन्यात मॉरिशस बेटावरील मराठी लेखक व कवी मंडळींनी 'मॉरिशस मराठी लेखक संघ' स्थापन केला. या प्रसंगी या मोरस मराठीत लेखन करणाऱ्या लेखक संघाने **'मराठी उषा'** या आपल्या मुखपत्राचा पहिला चक्रमुद्रांकित अंक मराठी भाषेचा आपला आविष्कार घडवीत प्रकाशित केला आहे. धर्मा गोविंद हे या संघाचे अध्यक्ष आहेत. प्रेमदेव इट्टू, देवजी पडीया, राजेन रामा व होमराजेन गौरीया हे या संघाचे सभासद आहेत. विरजानंत मल्लू हे सहसंयोजक (Coordinator) आहेत. पहिल्याच अंकाच्या आपल्या संपादकीयात संपादक लिहीतात, **'मॉरिशस मराठी लेखक संघ'** ही संस्था निर्माण करण्याचा हेतू हा की आपल्या तरुणांच्या व तरूणींच्या अथवा आपल्या वर्तमानकालीन पिढीच्या हातून मराठी भाषेची सेवा होवो. तिची वाढ होवो, ती प्रत्येक मराठी माणसाच्या घरी दारी मनी हृदयी जाऊन नांदो. आपल्या तरुण लेखक आणि लेखिकांच्या हातून तिचा प्रचार व प्रसार होवो. मराठी भाषेला पूर्वीप्रमाणे बोलली जावी. ऐकली जावी. ऐकली जावी. कथा असो. कीर्तन असो. भजन असो अथवा प्रवचन असो. सर्वचे सर्व मराठीतून करता यावी ही या संस्थेचे स्वप्न आहे. हीच तिची मनीषा आहे....' 'मराठी उषे'च्या मुखपृष्ठावर मराठी भाषेचा सूर्योदय होत आहे व फुलांच्या एका नाजूक फांदीवर बसून सुस्वर

अनुक्रमणिका

आवाजात दोन चिमण्या तिचे स्वागत करीत आहेत असे साधे पण भावपूर्ण रेखाचित्र देण्यात आले आहे. या अंकात कथा, कविता, निबंध व टीपणे आहेत. आजचे मॉरिशस बेटावरील मोरस मराठीतील आघाडीवरचे कवी, नाटककार व निबंधलेखक देवजी पडिया यानी 'मराठी उषे'त एक भावनेला व बुद्धीला आवाहन करणारा–'**या आपण एक नवे मराठीमय वातावरण निर्माण करू या.**' या शीर्षकाचा प्रदीर्घ पण बोलका लेख लिहीला आहे. आपल्या लेखात मॉरिशस बेटावरील मराठी भाषेची परंपरा व परिस्थिती वर्णन करताना देवजी पडीया, आपल्या मोरस मराठी भाषेत लिहीतात, 'आपले पूर्वज महाराष्ट्रातून मॉरिशसला आले तेव्हा त्यांनी आपली मराठी भाषा, संस्कृती, धर्म व परंपरा बरोबर आणली. इकडे त्यांना लाखो अपेष्ठा सोसावी लागली तरी त्यांनी आपली भाषा वापरली. पूजाअर्चा, देवाणघेवाण मराठीतूनच व्हायची. कथा, कीर्तन, भजन, संध्यापाठ-सर्वचे सर्व मराठीतून होत असत. रात्रीच्या वेळी आपल्या मुलांना धुळपाटीवर गमभन शिकविले व आपापल्या कुवतीप्रमाणे व सोयीप्रमाणे ही मराठी भाषा टिकवली, महाराष्ट्रात ज्या प्रमाणे दर दहा मैलांवर मराठीचे स्वरूप बदलते त्याच प्रमाणे इकडे सुद्धा कोकणी मराठी, पुणेरी मराठी व देशी मराठी भाषा आपण नेहमी ऐकत आलो आहोत. पण आता ती कानावर फार कमी पडते. आज प्रत्येक मराठी माणसाच्या घरातून मराठीची दुर्दशा होताना दिसते. ती आज फक्त जुन्या माणसांची भाषा बनून बसली आहे. नवीन पिढी आणि हे तरूण वर्ग तर मुळीच मराठीतून बोलत नाहीत. आज आपल्या घरात पुन्हा मराठी वातावरण निर्माण करावयास पाहिजे. आज पुन्हा आपले घर हे मराठी घर म्हणून निर्माण करायचे आहे.'

आजच्या मॉरिशस बेटावरील मराठी भाषेची दुरवस्था वर्णन करीत देवजी पडीया तेथील तरुण पिढीला विलक्षण कळकळीचे आवाहन तळमळून करीत असताना लिहीतात, 'मराठी अमृत आज कमी पडत आहे. नव्या जुन्याच्या या महाभयंकर वावतळीत आमची थोर संतांची माय माऊली, आमच्या पुर्वजांची मधरूपी, अमृताशी पैज जिंकणारी मराठी भाषा आमच्यात असून ती परकी होत चालली आहे. आज तिचा उपासमार होत आहे. आज ती नव्या जुन्याच्या भयंकर चक्रव्यूहात सापडली आहे. नव्या जुन्यांच्या अक्राळ विक्राळ जबड्यात ती सापडली आहे. आमची मराठी नौका परिवर्तनाच्या खोल सागरात काठापासून दूर दूर मृत्यूच्या मुखात चालली आहे अन आपण वेळीच सावध होत नाही. आपले पूर्वज लाखो संकटांना वाकुल्या दाखवून माय मराठीला जीवंत ठेवेल, आज आपल्याला भरपूर वाव असून, आम्ही तिला स्वहस्ताने, स्वहिंताने जणू मारत आहोत. तिची ती दारूण कळकळ ऐकून आमचे काळीज तीळ तीळ तुटत नाही. उलट कृतघ्नांप्रमाणे तिचे मंदमरण आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत, बंधुनो-भगिनीनो आज जर आपण सावध झालो नाही तर उद्या आपले मरण आपल्या डोळ्यांनी पाहू. पूर्वजांच्या लाख प्रयत्नांना काळीमा लावू त्या मधाच्या पोळ्याला भोक पाडू व त्यातील मधुकण गमावून बसू. आमच्या पुर्वजांनी मधमाशांप्रमाणे फुलाफुलांतून वण वण करून कण कण मधु गोळा केले व मराठीरूपी पोळा निर्माण केला. तो लयास जाऊ नये म्हणून सर्वांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे.'

आपल्या लेखाचा समारोप करताना देवजी पडीया भारावून लिहीतात, 'आपल्याला प्रथम आपल्या घरात मराठीचे वातावरण निर्माण केले पाहिजे. सुरुवातीला आपणास थोडी कठीणाई होणार. होऊ द्या. पुर्वजांचे आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवून आपल्याला नवा इतिहास घडवला पाहिजे. आपली तुटकी-मोडकी मराठीच बोलू. हळू हळू शुद्ध मराठी येईल. बाळ ज्याप्रमाणे आजन्म बोबडे बोलत नाही. त्याप्रमाणे आम्ही तुटकी-मोडकी मराठी बोलणार नाही. ती पहाटेच्या सूर्यकिरणाप्रमाणे वाढत जाईल व पुन्हा पुर्वीप्रमाणे आपण मराठी बोलायला लागू. घरातील वातावरण मराठीमय करण्यासाठी मराठी रिकोर्ड-मराठी गाणी, अभंग तसेच भजन, कीर्तन, प्रार्थना, रेडिओ कॉसटवर रिकोर्ड करवे व पुन्हा पुन्हा

अनुक्रमणिका

परिवारासह ऐकावे. अभ्यास करावे व गाणी कविता गावे. घरात आजोबा असतील, आजी असेल त्यांनी मराठीतून गोष्टी सांगायला लावणे... आपल्या मुलांना मराठी शिकायला, बोलायला, वाचायला भरपूर वाव द्या. सण समारंभाच्या वेळी त्याना भरपूर संधी द्यावी. मराठीतून विविध विषयांवर वार्तालाप करा. भरपूर बोलचाल-चर्चा व संभाषण केल्याने जिभेला मराठी बोलाची सवय होईल व मराठीची अवीट गोडी आपल्या मनात भरेल... मी माझ्या मराठी भाषेला कधिही पडू देणार नाही. या जिद्दीने चला आपण बरोबर पुढचा पाऊल उचलू. प्रत्येक मराठी माणसाला मराठी बोलायला शिकवू. चला आपण बरोबर शपथ घेऊ. एकही घर मराठीमय झाल्याविना राहणार नाही अशी दक्षता घेऊ. असे केल्याने आपली मराठी भाषा आपल्या वैभवात नांदेल. मग ती रेडिओवरून दूरदर्शनावरून चमकताना दिसेल. घरोघरी, गावी व सबंध देशात अभिमानाने मान उंच करून आपली मराठी हिंडू शकेल व प्रशंसा दुसऱ्यांना सांगेल...'

मॉरिशस बेटावरील मराठी माणसे गेली दीडशे वर्षे आपल्या मायबोलीची प्राणप्रतिष्ठेने व एका दुर्दम्य जीवननिष्ठेने उपासना व जोपासन करीत आहेत. एक छोटासा महाराष्ट्रच एका छोट्याशा बेटावर हिंदी महासागराच्या पोटात मराठी भाषेचा आणि मरहाठी सर्जनक्षम अस्मितेचा बाणा उराशी बाळगत वाढतो आहे, पोसतो आहे, धडपडतो आहे, ही मोरस मराठी भाषेची वास्तवता महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या चार मोरस मराठी पुस्तकांवाटे महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या ध्यानीमनी आल्याविना राहणार नाही. मराठी भाषेच्या इतिहासातही या घटनेची समग्रपणे नोंद होणे आवश्यक आहे, असे प्रत्येक मराठी भाषिकाला पटल्यावाचून राहणार नाही.

१३ फुलराणी
साहित्य सहवास
वान्द्रे (पूर्व) मुंबई ४०००५१

**प्र. श्री. नेरूरकर**

अनुक्रमणिका

## बाहु रानी

ही माझी बाहुली रानी
पाहा पाहा बाबा हिला
तिच्या गळी शोभे जरी माळा
ही माझी सहानी जनी रानी
चला पाहू तिचे गमत करनी ॥ १ ॥

कमर लचकुनि मचकुनि चाले
सारी चोळी नेसुनि चाले
असे चाले तिचे गमती कहानी ॥ २ ॥

एक होते राजारानी
त्यानी दिले मोती दाणी
ते तीने लाविले जमीनी
त्यावर तीने घालीले पाणी ॥ ३ ॥

दिनोदिनी वाढूं लागे
कळ्याना फुले भरूं लागे
झाडाना मोती फुटू लागे
मोत्यांचा रास पाहा तिच घरी ॥ ४ ॥

ती सर्वांत झाली धनीमानी
लोक तिला म्हणे बाहू रानी ॥ ५ ॥

**धर्मा गोविंद**

अनुक्रमणिका

## आपला आवडता देश

हिंद महासागरी बसला आहे आपला देश
मोरिशस प्रसिद्ध झाला आहे आपला देश ॥
लावूनि यांच्या गळ्यांत डोंगरी माळ
नदी वाहूनि सोडी पायांखाली गोडी ताळ
उत्कर्श होई पाहूनि डोंगरी कपाल
असा थोर व सुंदर शोभला आपला देश ॥ १ ॥

येथे ज्वालामुखीनें तोंड उघडला
ज्यानी आपल्या मुखातून पाणी सोडीला
असा स्वछंद निर्मळ तान्ह हा विझला
अर्चिला देवसमा हा आपला आवडता देश ॥ २ ॥

आले होते जेव्हां आपले वाढवडील
सोना काढा दगड उलटुनि वडील
बैसूनि आले आपले भारती वाढवडील
जहाजावरून त्यानी सोडली भरभरा रीळ
उत्साह वाटे पाहुनि त्यांना सुंदर असा देश ॥ ३ ॥

होते दोदो पक्षी जे आज अदृश्य आहे.
पोल वरजनीची गोष्ट आपल्या सदृश आहे.
रंगीत भुमी परि सामारेलला इंद्रधनुष्य आहे.
पाहुण्यांस तिथे जागीचे इथे उत्तम दृश्य आहे.
सोन्यासारखा हा आपला पिवळा तांबुस देश ॥ ४ ॥

इथे लक्ष्मण पवाराची चिर स्मरणिय गाथा आहे.
जिथे पंडीत आत्मारामाची विणिमय गाथा आहे.
जिथें मराठी तेतुका मेळ वाढवाची शाळा आहे.
जिथें शिवरायाची विराजमान शूर गाथा आहे.
असा सुंदर न्यारा हा शोभला आपला देश ॥ ५ ॥

पांपलेमुस असा एक विशाळ उद्यान आहे
ज्यांत नाना विविधाचे भरलेले प्राण आहे
ज्यांत शिव सागर रामगुलामाचे शाण आहे
गणू, बापू पुढारी असून मी पुन्यवान आहे
असा मोकळा शोभला हा आपला देश ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

इथें आपण उत्तम शेती करणारी शेतकरी
इथें आपण उत्तम मोती मिळविणारी शहकारी
आपणांत कोणीच न करता इथें मुलुखगिरी
जिकडे तिकडे पाहा चौफरी हरभरी
असा विशावाचा आपला सुंदर माया देश ॥ ७ ॥

**धर्मा गोविंद**

[अनुक्रमणिका](#)

## कोठून आवाज येत आहे

बिगूळ वाजे आजादीचे, गगन गुंजतो नारांनी ।
मिळवित आहे मराठ्याची, गोडी नजर सिताऱ्यांसी ।
एक बात म्हणावे आहे, आज देशाचे आवडत्यांसी ॥
जनासी, नेतांसी, फौजाचे खरे कातरासी ।

(टेक) —म्हणावे एक बात मला ह्या देशाचे शूरांसी ।
संभलून राहा आपल्या घरी डरालेले रफतारांसी ।
नाचत आहे, आपले दुश्मन आपल्याच भिंतीसी ॥ धृ ॥

हे मोरिशसचे राहणारे, ऐका वेळीचे हाकीला ।
पसरूनी आली फुट इथे जो, दूर घालवा मां कालीला ॥
कधी जन्मू नये पुनः या द्वेष भाव होलीला ।
ज्यानी आत्मारामाला निले, याद करा त्या काळीला ॥
सगळी टोळी जळून जाते, मुठभर कोळतीनी ॥ धृ ॥

जागा तुम्हाना पवाराची जागीराची रक्षा कराविजे ।
जागा लाखो लोकांची तस्विरांची रक्षा कराविजे ।
हली हली जे बनविले, त्या तस्वीराची रक्षा करावीजे ।
हुशार हुशार तुम्हाला आपली तस्वीराची रक्षा करावीजे ॥
येत आहे आवाज इथे देऊळ मस्जीद गुरु द्वारानी ॥ धृ ॥

**धर्मा गोविंद**

अनुक्रमणिका

## देशाचे उद्धार

ए माझे देशराणा, तुम्ही हो शूर बना ।
तुम्ही देशाचे करा आतां उपकार जरा ।
तन मन देऊनि रक्षावा रक्षावा ॥ धृ ॥

हे शिवाचे पुत्रगण, तुम्ही आतां करा शुधार ।
महाराष्ट्राचे तुम्ही हो मान हे गडे करा उद्धार ।
हो माझे हो माझे शिवतनया दाखवा कला ॥ धृ ॥

कधी आपल्यांत शिव होईल हो बांधवा जगांत आज ।
शदी पडली इथे महान अधर्माचे जगात राज ।
मिळूनि मिळूनि हात वाढून काम करा ॥ धृ ॥

**धर्मा गोविन्द**

-----

## कृपा करी

विश्व जग जननी । तुजवर कृपा करी ॥
विजय होई जगी । आपल्या भक्तां वरी ॥
विघ्न सर्व नाशनी । आपल्या जगां वरी ॥
विमळ बुद्धि भुवनी । चहू कडे सुपसरी ॥
मिळवुनि तार सरीतासी । सतत सत्रेची कळ्याण करी ॥
वितरन होई सर्व जगासी । विद्या समई भक्ता वरी ॥
निर्मळ भाव जागे त्यांसी । टाकुनि उडी सागरी ॥
विस्वांत प्रेम वर्धकांसी । विठ्ठळ फार कृपा करी ॥

**धर्मा गोविन्द**

अनुक्रमणिका

## गेली सांगून माझी आजी

गेली सांगून माझी आज ग
माणसं पूर्वीची होती भोली

त्याना खायला मिळत नव्हतं
कधी दिवस उपाशी होता
त्यांना हाणून मारून आणत होतं.
काही तरी बोलत नव्हतं: मुकाट्याने सोसत होतं
जीव लावत होतं मुलावरी

त्याची वाढत होती मुलं
कोणी त्याना पाहत नव्हतं
जशी बागेतील कोवळी फुलं
त्याना मुरडून फेकीत होतं
गोऱ्या गोमट्याना भळतच सुचत होतं
म्हणुन काय तरी करीत होतं
काही ना करता म्हणावं हाजी

त्यानी पहिल्याच घटक्यात धरलंन ठेवा
मनात हो धामात
त्यानी बायाची अब्रु लुटलन ठेवा मनात हो
कोणी धडपड केली तर सोठाचा मारा
पडत होतं अंगावरी
रक्त वाहू लागे माझा अंगी

**वसंतराव गणपत**

अनुक्रमणिका

## बहिष्कृत

माझे अंगठे आहेत पंजांसारखे
माझे तळवे कड्यांसारखे दऱ्याखोऱ्यांच्या
खाली माझ्या गुडघ्याच्या
माझी कातडी आहे टणक कासवाच्या कवचासारखी
माझी तुटलेली नखे आणि कठोर हात
श्रम आणि सुरकुत्या धारण करतात
माझ्या पूर्वजांच्या ज्यानी केलं धाडस येण्याचं
सूर्यतप्त डोंगरी भागातून रत्नागिरीच्या
दूरवरच्या प्रदेशात
उचलण्यासाठी वर दगड सोन्यासाठी
★

प्रतिध्वनी घुमणाऱ्या ढोलांचे आणि धुंदफुंद नृत्याचे
पूर्वजांच्या जंगलातून
सळसळतात माझ्या आदिवासी रक्तामध्ये.
रक्तबंबाळ होत धन्याच्या खुनी चाबुकाखाली
माझे पूर्वज आणून टाकलेले दऱ्याखोऱ्यांतून
आणि रानटी बोरांवर, मध आणि मासळीवर ते जगले.
तरीही भयग्रस्त भाडोत्री शिकाऱ्यांपासून
धुंडाळत फिरत होते जे त्यांच्या मुंडक्यांसाठी
★

उनाड रक्तत कॉर्सेअरचं
निघून येणाऱ्या मार्सेल्वरून
वहातेय माझ्या धमन्यांतून
मी ठार करू शकणार नाही का आशियाई माझ्यातला?
मी होऊ शकणार नाही का पूर्णपणे युरोपियन?
का मी जन्मलो असा? का? का?
माझा रंग, माझे तुरुंग गज.
मी आहे रक्ते तीन खंडांचे
सरमिसळलेले माझ्या समुद्रबेटी घरावर
मी आहे मूल या जगाचे:
बहिष्कृत.

कवी: **आनंद (सावंत) मल्लू**
**मॉरिशस**
मराठी अनुवाद : **प्र. श्री. नेरूरकर**

अनुक्रमणिका

To,

**P. S. Nerurkar**

## Shivaji

When Bharat was robbed,
    Cheated, deceived, trapped...
Shivaji became a light to the people in gloom
He blessed Mother India
    with his footsteps
In the Darbar of Adil Shah
When he refused to bow down
    to the Mughal Monarch
To him to be strong
    was not the undoing of the weak
Friend of the peasantry
    and the dispossessed
His message of freedom
    based on dignity of Man
Echoed in the heart of
    the Mauvala mountaineers,
And it was "Comrades, be bold
    and never be meek.
Follow me Marathas in the sandy hills
    to fight for a better tomorrow
To me, a grave is better
    than a Kingdom from Aurangzbe.
Forget not that if Afzul
    has been our enemy
Banda Khan, patriot, our brother..."

The waves stood still at Sindu Durga
The wind gathered speed at Raigad.
And Swept the Shah of Shahs off his feet.

Hossnejee Edoo
Mauritius

अनुक्रमणिका

## शिवाजी

जेव्हा भारत गेला लुबाडला
फसवला, ठकवला, कोंडला
शिवाजी झाला प्रकाश लोकांना औदासिन्यात.
त्याने पावन केली माता भारत
आपल्या पावलांनी
दरबारात आदिल शहाच्या
जेव्हा त्याने नाकारलं कुर्निसात करायचं
मोगल बादशहाला.
त्याला बळकट असणं
नव्हतं लाचार होणं दुबळ्याचं
दोस्त कुणब्यांचा
आणि निर्धनांचा
त्याचा संदेश स्वातंत्र्याचा
उभारलेला प्रतिष्ठेवर माणसाच्या
दुमदुमत होता हृदयाहृदयात
मावळ्या डोंगरवासीयांच्या.
आणि तो होता, 'सवंगड्यानो, व्हा धीट
आणि कधीही नका होऊ शरणागत.
माझ्या मागून या मराठ्यांनो या वालुकामय डोंगरकपाऱ्यातून
लढण्यासाठी अधिक चांगल्या उद्यासाठी
मला थडगं अधिक बरं
साम्राज्यापेक्षा औरंगजेबाच्या.
विसरू नका जरी अफझुल
होता आपला शत्रू
बंडा खान, देशभक्तु, आहे आपला भाऊ...

लाटा स्थिर झाल्या सिंधुदुर्गाजवळ
वाऱ्याने धरला वेग रायगडाजवळ
आणि पाडले पातशहा मागून पातशहा उताणे
दख्खनच्या वादळावर.

मराठी अनुवाद: **प्र. श्री. नेरूरकर**
मूळ कविता : हुसेनजी एड, मॉरिशस

---

**टीप :**

१ मे १९८० रोजी मॉरिशस बेटावर, प्र. श्री. नेरुरकर हे तेथे साजऱ्या झालेल्या 'शिवाजी उत्सव व महाराष्ट्र दिवसा'चे प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित होते.

अनुक्रमणिका

मॉरिशसमधील पुरोगामी विचाराचे आघाडींवरील कवी, समीक्षक व प्राध्यापक हुसेनजी एडू यांनी ही खास त्यादिवशी लिहिलेली कविता ‘शिवाजी उत्सवा’ त ‘महात्मा गांधी’ संस्थे’ त सादर केली.

अनुक्रमणिका

## The Outcast

My toes are like caws
My soles like rifts of valleys
Below my knee
My skin is crusty like tortoise shell.
My broken nails and callous hands
The labours and wrinkles bear
Of my forbears who ventured
From the parched hills of Ratnagiri
Into distant land
To lift stone for gold.

☆

The echoes of throbbing drum and frenzied dance
From the ancestral jungle
Pulsate in my tribal blood.
Bleeding under the master's murderous whip
My forbears marooned into the ravine
And on wild berries, honey and fish.
Existed.
Yet fearful of the hired hunters
Prowling for their scalps

☆

The vagabond blood of a Corsair.
Hailing from Marseille
Courses in my veins.
Can't I kill the Asian in me
Can't I wholly the Europeon be?
Why was I born thus? Why? Why?
My colour, my prison bars
I am the blood of three continents
Mixed on my island home.
I am the child of the world:
Outcast.

अनुक्रमणिका

Anand Sawant Mulloo
Mauritius

# अनुक्रमणिका

## मॉरिशसचे गाणेः

सारे मिळुनी गाऊ गान ।
मॉरिशस हा देश महान ॥ धृ ॥

सुंदर शेते हिरवीगार ।
रस्ते दिसती काळेशार ।
रम्य वनश्री अपरंपार
दिसत असे हा जरी लहान ॥ १ ॥

विविधरंग हे जमिनीचे ।
नंदनवन हे अवनीचे ।
सप्तरंग हे करितात ।
इंद्रधनूची वरती कमान ॥ २ ॥

रंगित सागर सभोवती ।
निळसर डोंगर दऱ्या शोभती
इवल्या इवल्या नद्या वाहती ।
देश आमुचा स्वर्गसमान ॥ ३ ॥

इथे बोलती बहुभाषा ।
वेषभूषा नि केशभूषा ।
धर्म संस्कृति विविध असे ।
स्वदेश-मोरस अमुचा प्राण ॥ ४ ॥

मॉरीशस हा देश लहान
मॉरिशस हा देश महान

मॉरीशस बेटावरील
[मराठी लोकांनी रचलेले]

अनुक्रमणिका

## एकदा सागरातून उमळून आले मोती

एकदा सागरातून उमळून आले मोती
हृदयी माझ्या भासली किरणे कोटी
आज खरा आनंद जुडला किती
जिगर चिरूनी पहावे राहील स्मृती ॥

भरत-रामाची आठवील ही भेट
गोष्ट खरी मारीच देसाची ऐट
गमन करताना जेव्हा आकाशयानी
स्मरेल निजमनी माझ्या देशाची धरणी
जनमानसाची लेऊनी अखंड प्रीती ॥

पाकळ्यावर कमळाच्या कसे झळकती
भासती ही दोन टप्पोरे मोती
मुखातून वाहे अमृतमय सरिता
सकळ समाजाचे साहित्य जनिता
वाट चाल तुमची देईल स्मृती ॥

**धर्मा गोविंद**

अनुक्रमणिका

**ॐश्री ग णे शा य न मः**

## दशावताराची कथा प्रारंभ

हरि बोला हरि बोला हे
ॐकारप्रधान आहे
विद्यासागरा आहे
माता पिता आहे
गुरु नाथा आहे
संत सज्ञना आहे

### ओवी

सुरासुर अम्रतं व रणं सुरोरेशा
आधी वंदू तुज गणेशा
गणपती गणपाला दीनबंधू दयाळा
मती मज बहु देई यश होई भक्ताला
भजन पूजन नेणो अन्याय घाली पोटा
हसतील जन ऐसे तारी लक्ष खोटा

### गणपतीची स्तुती

ॐ नमो नमन शंकर तनयाचे करितो
उभे पदांजुळ जोडुनिया करतो प्रथम तव
सुशोभित मुषकवाहना वरी अरडुनी
धाव पाव जगदीशा नाटकामध्ये मी अजानी
रंग सभा आज बहुत मिळाले या नाटक रंगणी
कैसा नाटक रंग होईल कारण जीव हा डगमगतो.
वक्रतुंड एकदंता तुझ्या मस्तकी हिरामणी
गळ्यामध्ये तुळसी माळा झळके सगुमणी
चतुर भुज अवतार विष्णूचा साक्षात अजुनी
रंग सभेत आला प्रकाश जैसा भास्करणी
पुढे मती मज देई गणेशा चतुर्थी आख्यान
गोड कथा रस करी गणेशा जन मन रंजन
ऐशी स्तुती कैलासी ऐकिले कैवल्या दानी
दास रामचंद्र चरणावर धाली लोळण
ॐ नमो नमन...

अनुक्रमणिका

**ओवी**

श्री वक्रतुंडं मुषक वाहनं प्रभो
दीन दयाळा सिंदूर चित्रं विभो
पाष्या कुस दुर्वा समिपात्रं विभो
मदे सुरवरणं नसतेच गायन विभो

**ताल-द्वारपाल**

पार्वती परमेशा । जय हरी वर दे मपपुरुषा
**तारे रामा तारे देवा वारण वारे**

**ओवी गणपतीची**

श्री वक्रतुंडा लंबोदरा । भक्त वत्सला विघ्नहरा
त्वरित येईगा गिरिजा पुत्रा । नाटकारंभी उद्धारी गा
जया जयाजी मोरेश्वरा । जया जयाजी लंबोदरा
जया जयाजी विघ्नहरा । गौरी कुमारा तुज नमो
सिंदूर चर्चुनी मूषक वाहना । गौरी नंदना तुज नमो

**गणपती सभेत प्रवेश**

गिरजा सुता विघ्नहरा जय देवा गजनना
कोमल नाजूक तुझे पाय । मजवर माया स्पुर्ती नाय
रिध्दी सिद्धी तुझे पाय । दास होऊन रमती हो
विष्णूचा अवतार गणराय । केले महिषासूर अन्याय
पार्वती म्हणे बुद्धीत बाळ । अवतार विघ्न निवारण
कोठवरी वर्णावे तुझे गुण । नाटकामध्ये आहे की अज्ञान
भावे नमितो तव चरण । हो साह्य कार्यी ह्या दीना

**ओवी**

तोरे प्रगटला विघ्नहरा । नाभी नाभी सुत्र धारा
तुझी ऐकूनीया करूणा थोरा । सभेत प्रगटलो पाहे पा
दीन उद्धारा कारण । म्या रूप धरिले सगुण
तरी तू निवेदी संकष्टपूर्ण । जे काय इच्छा मनासी

अनुक्रमणिका

**पद**

शंकर तनया नमितो पाया मला ती सुमती दे
हे गणराया व्यसन हराया मला ती सुमती दे
नाटक कराया हे प्रभू राया मला ती सुमती दे
झिजो काया शरण रिघाया मला ती सुमती दे
येई सदया परि रमाया मला ती सुमती दे
तुज स्मराया पद पुजाया मला ती सुमती दे
भक्तराया शिव वराया मला ती सुमती दे
नव वराया तम त्याजाया मला ती सुमती दे
सदये तुम्हा गणपती हो सकळ सकळिका
अज्ञान ही बुद्धी माझी तारी भाविका
नेती नेती सुरती म्हणती ज्याची ही लीला
ब्रह्मदेव शोधुनीया बहुत शिणला
वरण्याली वाणीलासी वाणी निर्मिला
बहु दुःख मोचनासी सगुण जाहला
दीन स्वरये बहाती तुज भक्ती वत्सला
हरी का वीण ज्याची संजी हाय कामुका

**ब्राह्मणाची ओवी**

वालं भटं गुंडे भटं । यावे यावे आणा
फार वेळ झाला गणेश पूजना
ईश्वर मूर्ती उभी घरी घंटे दोन
अजून सोहळे तुझे का सरेना

**ब्राह्मण प्रवेश**

आलो मुला आलो मुला जरा जरा थांब
माझे मी पण विसरलो बोडकीण धरले कान
काल रात्री गुंडगुल भटा घरी होते खंजुरी
वेडा मी एक पारक झालो पोट झाले भारी
प्रातःकाळी वेळ झाला आज प्राधना
सूर्य नारायणासी मी केला नमन

**भट पुजेची सामग्री सांगतो**

गंगा भागीरथी सरस्वतीच यमुना गोदावरी नर्मदा
कावेरी सरयू महींद्र तनया शर्मन्वती वेदिका

अनुक्रमणिका

क्षिप्रा वेत्रवती महासुरनदी ख्याता गया गंडकी
पूर्णा पूर्ण जले समुद्र नाना सहित समर्पयामी.

**ओवी**

अबीर गुलाल चुवा चंदन कस्तुरी
नाना फुले सोबत करी
तयाचे नाव निवेदितो करी
ते चतुरी परियेसीजे
जाई जुई चऊ भट मोगरा
पुष्पे माळती दुर्वांकुरा
बकुळ शेवंतीचा पसारा
अर्पण केले गजवदना
फुलात फूल उसाचे फूल
तयासी नाही लागेल मोल
आणखी फूल गुलाबी फूल
लाल फुलांनी गणोबा शोभला
कानवल्या सांडग्या पापड पोळ्या
मोदक लाडू घाऱ्या पुऱ्या
शर्करा मिश्रीत लंगू वड्या
असंख्य दुरल्या आणिल्या
आम्र जांब ताड नारळी
केळी बदाम पेरू आवळी
रामफळे सीताफळे चीन पोपया
उठा वेगी गणेश भोजन कराया

**भट-संकल्प सोडणार**
**आरती**

जय देव जय देव जय उंदीर मामा
तुमच्या चरणाची गोडकी आम्हा
रात्रीच्या प्रहरी चोरीचा थाट
गडग्या मडक्यावरी तुमची खटपट
अवचीत पडली बोक्याची गाठ मांजराची गाठ
तोंडात घालून रगडून तारण करीत

**पद**

वक्रतुंड एकदंता कलिम लंतका

अनुक्रमणिका

मनोविकार ताप भंगी तारी भाविका
रक्त गंध अक्षताही आप मंगला
दुर्वांकूर बिल्वपत्र समिही कोवळा
जास्वंद कमळ बकुळ प्रिय जे तुला
गुलाल अबीर धूप कर्पुरादी पालका
मुखशुद्धीस तांबूळ हा घेई निश्चिती
भक्त जना मेळवुनी करीत आरती
मंत्र पुष्प शुद्ध मने करीत तुज प्रती
तव सेवेलागी देई शुद्धसी मती
हेची आता प्रार्थी तुला जगत् चालका

### भटाची स्तुती

भोवी भोवी भो गणेशा देवा
मनो भावे सदा करू तुझी सेवा
तुझ्या भक्तीने यश मज मिळे
उद्धार निर्वाहा करी तू वहिले
एकदंता तुझे सोंड शोभले
ह्याच प्रसादे लाडू मज मिळे
सव्वा शेर दाणा पान सुपारी
नारळांनी माझी भरलिया झाळी
दुर्वांकुर समिपात्र करूनी
तुझ्या स्मरणाने मिळती दुगानी
दास तुझे येती पूजन कराया
दक्षिणा मज देती दोन दिडक्या
ऐसा तू उदार सिद्धीच्या नायका
तुझ्या पुजेवीण वेळ जाऊ नदे फुका

### भट सभा विसर्जन

जय हरी विठ्ठल । जय हरी विठ्ठल

### पद गणपतीचा

ह्या गणीदास देवाचे घेई तारक नाम
करूणा सागर चिंतीले ते करी पूर्ण काम
महा विष्णूचे रूप हे जाण नोहे आण
भिजाक्षर मंत्राने पुजूनी बरे करावे ध्यान
टाळ मृदंग नादाने सुस्वर गावे गाण

अनुक्रमणिका

भाव भक्तीने तुज वंदितो अहा मूषक वाहन

**ताल-द्वारपाल**

गणपती गणराजा थैय थैय था
गणपती गणराया चतुर भुज शोभे महाराजा

**ताल-राधा**

रिद्धी सिद्धी विनायका नमू नमू मंगलदायका

**ओवी**

श्री वक्रतुंडा गजवदना
पुढे चालवी दशावतार आख्यान
श्रवण करी गा जन मनोरंजन
विध्नहरता दयानिधे

तेव्हा बोलिला गजवदन
तुझे इच्छित होतील पूर्ण
तुज होईल त्रिकाल ज्ञान
करी ध्यान वागेश्वरीचे

**आर्या**

रिद्धी सिद्धी सहित रामा रिद्धी सिद्धी........
संगे घेऊनी जय विजय हो
जातो कैलास मार्गानी रामा......
तोरे पावला संगे गजवदन
गावा रसक जन हो रामा....
रात्रंदिवस सदा गजवदन

**सर्व विसर्जन**

**ताल**
धाव विभो करूणा करे...

अनुक्रमणिका

**ओवी**

प्रार्थी तुजला सरस्वती
धाव पाव मती दे स्फुर्ती
हे विघ्न आहे पुढती
वेगी निवारी जगदंबीके

शारदा ब्रम्ह्याची कुमारी
वीणा पुस्तक घेऊनी करी
हंसा वरुनी गमन करी
ब्रह्म कुमारी तुज नमो

ॐ नमो आदी माय नंदीनी
किरीट कुंडळ शोभे श्रवणी
वीणा हस्तकी हंस वाहिनी
जग जननी तुज नमो

**शारदा प्रवेश**

ब्रह्म तनया नमितो...
जय वागेश्वरी देवी...

**संभाषण**

हंस वाहिनी ब्रह्म नंदिनी जगत जननी

**ओवी**

आता नमू शारदा सुंदरी
आला बैसुनी हंसावरी
तिने वळली माझी वैखरी
आली द्रदयी विज्ञानी
म्हणे वत्सा सुत्रधारा
काय संकष्ट निवेदन करा
तुजला प्रसन्न झालो करी थोरा
सांग इच्छा हंसा तुझी
तेव्हा म्हणे नाटक करता
मी अज्ञानी जगन्माता
नकळे कैसे वदू आता

अनुक्रमणिका

नाही स्फुर्ती मजला गे
नकळे कैसे होईल पुढे
कार्यामध्ये येतील बहु साकडे
ते तू निवारी हे तू करी
नाटक पात सुज्ञ करी
तेव्हा म्हणे वागेश्वरी
तू चिंता काही न करी
जन मनोरंजन होईल दुरी
मम स्मरण करी भक्त राया

**पद**

ऐशी गजवदनाची ज्यानी भक्ती केली साची
ज्यानी भक्ती केली साची अनुप कुमाराची
पाकरू थैय वा वा पाकरू थैय
ॐ दीग दीग थैय-तादिना दीन तादिना

**छंद**

द्रौपदीचे वस्त्र हरण करिता झाला दुर्योधन
म्हणुनी तुझे नाम स्मरण पावलासी गे
ॐ दीग दीग थैय..

**छंद**

प्रसन्न होऊनिया बोल गे
ह्या रंग सभेमध्ये डोल गे
परी मोरावरी बैसुनीया सरस्वती आली गे
ॐ दीग दीग थैय...

**ओवी**

नाटक पात्र सुज्ञ करी
माझी जीवाग्री स्मरण करी
सकळ खेळीया ते उद्धरी
आणिक मागणे काय आहे.
सत्य सत्य त्रिवाचा
तुझ्या खेळी या नाही विध्नाचा
तेथुनी भय नाही काळाचा

अनुक्रमणिका

तुजला आशीर्वाद आहे माझा
तू जे नाटक योजिले मनी
संपूर्ण पावसी आनंदानी
श्री शंभा हिमन बाळाचे स्तवन
सादर येथून होईल
हंसारुढ होऊन
ब्रम्हा लोकी करी गमन

**ताल–शारदा विसर्जन**

चाले हंसा ब्रम्हा लोकी /चाले हंसा...

**धावा**

महादेव नाथ महेश्वरा देवा तुझे द्वारा

**ओवी**

कर्पूगौरा हिंदू शेखरा
भाल लोचन शोभतो बरा
गळा रुद्र माळाचा पसारा
ऐसा शंकर नमितो
नंदी वाहना चकोर चंद्रा
नीळ कंठ वाहन पणी पै डोळा
हाती डमरू त्रिशूळ
ऐसा शंकर नमितो
हरा ईश्वर शायी हिमन गजमाता शंकरा.
जेट तुनी गंगा वाहे झुळझुळा
भाल लोचनी भाल चंद्रा
नंदी केश्वरा धावे गा
श्री. शंकर माय बाप दयाळा
तुझ्या कंठीचे शोभती रूद्र माळ
तुझ्या मस्तकी वाही माता गंगा
तुझ्या स्मरणाने पाप होतील भंगा

**ताल, पद-शंकर प्रवेश**

कैलास वासी शिव शंभा
डमरू वाजवी नबा हे नवा

अनुक्रमणिका

नंदीवरी अरडुनी शिव
मांडीवरी बैसे गणेश देव
अर्धांगी पार्वती शोभे हिरा
जटेतुनी गंगा वाहे झुळझुळा

**संभाषण**

**ओवी**

कैलासातुनी हर निघाला
तो येथे येऊनी पोचला
देवावया क्षमा भक्ताला
अवतारला योग योगी

**ताल**

अहो शंभा/कैलास शिवा पती/अहो शंभा

**ओवी**

तेथे होती हिमंद्र तनया
तिने नमिले शंभू पाया
दशावताराचा अर्थ पुरवाया
समर्थ तुम्ही असावे
शंभू म्हण पार्वती लागुनी
तू होशील चतुर शहाणी
तुजला सांगेन विस्तारूनी
दशावताराची कथा
जरी मी अज्ञानी त्रिजण
तथापी तुमचे कृपा भंजन
असेन तरी दया करून
सांगा मजला विस्तारूनी
देवाचे गजचर्म आणि लेखणी
काढिले अंजनी नेत्रातुनी
त्रिशुळाची करूनी ग्रहणी
करूनी लेखणी सिद्ध झाले
शंभू म्हणे ऐक पार्वती
ब्रह्मा द्विज आशा धरिती
पुढे दशावतार कथा निश्चिती

अनुक्रमणिका

सावध चित्ती परियेसी जे
आता प्रगटेल चतुरानन
त्याचे वेद करील हरण
सिंधू पुत्र विख्यांत जाण
नाम विधान शंखासूर
ऐक मम हिमंद्र गिरी बाळा
कैलासी जाऊ करी चाल
तेथे कथीन कथा भाग वेळाले
पर्वत बाळे सावध होई

**पद**

पाडसा सुत्रधारा जरा धीर धरे
माझी आज्ञा ही तुजला
ज्ञान होईल सभेला । हाच वर मी देतो
ज्या वेळी होईल तुज विघ्न
त्या वेळी कर माझे स्तवन
दुःख दरिद्री निरसुनी मम स्मरण दूर होती
सुखे नाटक करी । मी अरडितो नंदीवरी
कैलासी जातो सत्वरी माझा आशीर्वाद तुजला

**महादेव सभा विसर्जन**

**ताल**

स्मशान वासी हरूशी केशी । भक्ताची गोडी...

**ब्रह्मदेव सभा प्रवेश**

जय हरी ब्रह्मदेव । जय हरी ब्रह्मदेव

**संभाषण**

जय हरी विठ्ठल । विठ्ठल विठ्ठल

**शंखासूर प्रवेश**
शंखासुरा ये महादेवा...

अनुक्रमणिका

**संभाषण**
**ओवी**

पिता जयाचा सावळा
मातेसी नाही कान डोळा
पुत्र जन्मला तोही गोळा
नाम तयाचे शंखासूर

**ताल**
हौसन डुल्ला । हौसन डुल्ला...

**ओवी**

कशास केले माझे स्तवन
करी गा सुत्रधारा मज कथन
ब्रह्म चारी वेद निपून
करी गा तयाचे वेद हरण
ते आम्हासी देऊन
चित्त समाधान करी गा
शंखासूर म्हणे नाटका करिता
चारी वेद तुम्ही इच्छिता
ते आणुनी तत्वता
चित्त समाधान करितो

**वेद हरून शंखासूर विसर्जन**
**ओवी**

नाना विधी करूणा वहिले
शंखासूर ब्रम्ह्याचे वेद हरिले
अनुराष्ट कर्म राहिले
असूर सागरी पहुडला

**शोक**

धाव पाव हरी मजला तारी
तुज वाचुनी मज कोण कैवारी
शंख चक्र पितांबर धारी
लीला नाटक वैकुंठा श्री हरी
भक्त कैवारी करूणा करी

अनुक्रमणिका

पाव सत्वरी आता या वेळी
गरूड गमन पितांबर धारी
मधू मुरांतका हे श्री हरी
अनाथ नाथा भक्त कैवारी
दानव म्रदना हे श्री हरी

**नारद प्रवेश**

स्मरे केशवा माधवा भजा भजा
दक्षण माते तारी पतित
पावन होई तुम्ही जगा जगा । स्मरे केशवा

**संभाषण**

वीणा घेऊनिया हाती । चालिला पित्याच्या भेटी
जाऊन पुसे गुज गोष्टी हो । स्मरे केशवा...

**ओवी**

ऐकूनी पित्याचा कळोळ
धावुनी आला ब्रह्म बाळ
हाती वीणा तुंबळ
घेऊनी आला सत्वर

**आर्या**

नमस्कार करून पित्यासी । रामा...
वर्तमान पुसे हो पित्यासी
कोणी गांजिले तुम्हासी पिता । कोणी...
सांगा मजसी तुम्ही आता पिता/रामा...

**छंद**

ऐक नारद वर्तमान/तुज सांगतो विस्तारून
चित्त देऊन ऐक पूर्ण/एक माझे सत्य वचन
सिंधू पुत्र शंखासूर । तो ही माजला अफार
वेद नेले निशाचर । ब्रम्ह कर्म हे राहिले

अनुक्रमणिका

**ओवी**

नारद म्हणे पित्यासी
आता चिंता न करी मनासी
मी जाऊनी वैकुंठासी
ऋषीकेशी पाठवितो

**नारद सभा विसर्जन**

वीणा घेऊनीया हाती चालीला विष्णूच्या भेटी
जाऊन सांगे गुज गोष्टी हो । स्मरे केशवा...
जय हरी नारायणा जय हरी नारायण

**ओवी**

जया जयाजी निरंजना । जया जयाजी जगपालना
जया जयाजी विश्वभंजना । कमलवल्लभा महाविष्णू
तू असता ब्रम्हांड चालका
प्राण सख्या तुज नायका
दुष्ट दैत्य निर्दालका
रमा नायका तुज नमो
धाव पाव गा नारायणा
धाव पाव गा लक्ष्मी रमणा
धाव पाव गा मधुसुदना
जग जीवना तुज नमो

**विष्णू प्रवेश**

**ताल**

धावय पावय गा कमलावरा दीन दयाळा रामा...

**संभाषण**

**ताल**

कमळ नयना हरी भजा हो । कमळ नयना...

अनुक्रमणिका

**ब्रह्मदेवाशी संभाषण**

**ओवी**

जया जयाजी वैकुंठ विहारा
पुराण पुरुषा लक्ष्मी वरा
भक्त कैवारा करुणा करा
पाव सत्वर ह्या वेळा
श्री केशवा माधवा नारायणा
गोविंद विष्णू जनार्दना
वामन नेत्री विक्र मधुसुदना
दावन मर्दना श्री रामा
तू असता मधु कष्ट भारी
आम्हा गांजिले दुष्ट असुरी
आनंद कंदा रमाघना
लक्ष्मी रमणा तुज नमो
जय गोविंदा नारायणा
जग पालका जग जीवना
कशास केले माझे स्तवन
करी गा चतुराननां मज कथन
सिंधू पुत्र शंखासूर
तो ही माजला अफार
वेद नेले निशाचर
ब्रह्म कर्म हे राहिले
जरी तो गेला सुरासुरी
घाला घालीन तस्करावरी
तयासी मी निर्दाळूनी
वेद आणीन चतुरानना
जरी तो गेला देव लोका
ध्यान करीन सचिद नायका
धाक लावीन सत्य लोका
वेद आणीन चतुरानना
जरी तो गेला सप्त पाताळी
शेषाची बसवीन दाट खिळी
तयासी मी निर्दाळुनी
वेद आणीन चतुरानना
जरी तो गेला सप्त सागरी
मत्स्य रूप धारण करी
सप्त सागर धुंडाळुनी

अनुक्रमणिका

वेद आणीन चतुरानना
ऐसे बोलुनी नारायण
मत्स्यरूप धरी आपण

**ताल -सभा विसर्जन**
अगम निगम तुम्ही भजा
मत्स्यरूप तुम्ही धरा

**ओवी**
जेव्हा रिघाला सागरी
लाटा उसळल्या अद्भुत भारी
मत्स्यरूप धरिले श्रीहरी
समुद्र त्याने उचंबळला
पुच्छे करूनी समुद्र जळ
आकाशी उडवी तमाळ नीळ
कोंडून गेले गगन मंडळ
धाक पडला सत्य लोका

**शंखासूर प्रवेश**

कष्टाने डुल्ला । कष्टाने डुल्ला

**संभाषण**

**विष्णू प्रवेश**

भक्त कैवारा मत्स्य अवतारा धरी सिंधूरा

**ओवी**

सप्त सागर धुंडाळुनी
काढिला शंखासूर शोधूनी

**दोघांचे युद्ध**

सिंधुच्या सुता थैय थैय था । सिंधूच्या सुता
येई गा शंखासूर वीर नाथा....

भक्ताच्या दाता थैय थैय था ।

अनुक्रमणिका

भक्ताच्या दाता वधावा शंखासूर वीर आता

लाडूत बालंबा थैय थैय था ।
लाडूत बालंबा लाडू लाडू लाडूत बालंबा।....

**ओवी**

हरी वधी शंखासूर
गर्व त्याचा करी दूर
बीर सबिरी जमुना तिरी ।
अकडीत करणी वनमाळी

**ओवी**

तयाच्या मस्तकी गदा घालून
जड जड केले तेधवा
शंखासूर म्हणे गा श्री हरी
जड जड झालो गदा प्रहरी
आता आम्हा कैसी उरी
आज्ञा द्यावी प्राण रक्षावया
तेव्हा बोलिला नारायण
तुझा प्राण केला रक्षण
तुझे हस्त धरतील शोकडे
माझे वैष्णावे जन सारे
प्रथम पुजिती प्रेम बरे
नंतर मजसी दैत्य राया

**शंखासूर विसर्जन**

हौसेन डुल्ला । हौसेन डुल्ला

**ओवी**

शंखासुराशी वर देऊन
विजयी पावला नारायण
तेथुनी निघाला जगजीवन
ब्रम्ह्यापाशी जाता झाला

अनुक्रमणिका

**ताल-**

जय जय नारायणा । हरी नारायणा

**ओवी**

ब्रह्माचे वेद देऊन
संचित पावला नारायण
तेथुनी निघाला लक्ष्मीरमण
वैकुंठापुरी जाता झाला

**ताल-विष्णू विसर्जन**

कमळ नयना हरी भजा ।
कमळ नयना हरी भजा...

**ब्रह्मदेव विसर्जन**

जय हरी विठ्ठल विठ्ठल विठ्ठल । ...

**समाप्त**

[अनुक्रमणिका]

## गणपतीची आरती

स्थापित प्रथमारंभी तु मंगलमूर्ती ॥
विघ्ने वारूनि करिसी दीनेच्या पुरती ॥
ब्रम्ह विष्णू महेश तिघे स्तुती करती ॥
सुरवर मुनीवर गाती तुझिया गुणकीर्ती ॥ १ ॥

जय देव जय देव जय जय गणराजा ॥
आरती ओवाळी तुजला महाराजा ॥ धृ. ॥

एकदंता स्वामी हे वक्रतुंडा ॥
सर्वा आधी तुझा फडकतसे झेंडा ॥
लप लप लप लप लप लप हालवी गजशुंडा ॥
गप गप मोदक भक्षिसी घेऊनि करि उंडा ॥ २ ॥

शेंदूर अंगी चर्चित शोभत वेदभुजा ॥
कर्णी कुंडळ झळके दिनमणि उदय तुझा ॥
फर शांकुरा करि तळपे मूषक वाहन दुजा ॥
नाभी कमलावरते खेळत फणिराजा ॥ ३ ॥

भाळी केशरि गंधावर कस्तूरी टिळा ॥
हिरे जडित कंठी मुक्ता फळ माळा ॥
माणिक दास शरण तुज पार्वती बाळा ॥
प्रेमे आरती ओवाळिन वेळावेळा ॥ ४ ॥

## रामायण कथा प्रारंभ

**प्रार्थना**

करीन नमीन वंदीन गौरी वल्लभा पदाते
कथीन दशरथाची कीर्ति संपदात

**वशिष्ठ प्रवेश**

जय हरी विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ।...

**संभाषण**

**ओवी**

श्री गजाननास नमस्कार करून
श्री अयोध्यापती राजा अजपाल नंदन
हेच कीर्ति संपदा कथन
करू त्याचे असे आशीर्वादे करून

**वशिष्ठ विसर्जन**

जय हरी विठ्ठल ।...

**ओवी**

दशरथ रविवंशी अयोध्याचा राजा
कुसळण नृपतीची कन्या नेमिले ह्यास भाजा

**म्हालदार प्रवेश**

अस्तके तो महाराजा ।....

**संभाषण**

**दशरथ राजा सभा प्रवेश**

अजपाल नंदन । थैय थैय था ।
अजपाल नंदन येईगा दशरथ कुळभूषण

अनुक्रमणिका

**संभाषण**

तारे रामा तारे देवा ।...

**ओवी**

लग्न झाले या समुद्रात
मग पातलो अयोध्यापुरात
राज्य करीता मी तेथ
सहस्त्र वर्ष लोटली पहात
परि पुत्र पोटी नाही संतान
चित्त राहिले व्यापिले मन
रात्री पाहिले एक स्वप्न
वधिले तिघे ब्राह्मण

**शोक दशरथाचा**

शिव शिव नारायण
धाव मन मोहना । धाव मन मोहना
वैकुंठवासी देवा परमेशा जग पालना

**वशिष्ठ प्रवेश**

जय हरी विठ्ठल ।...

**संभाषण**

**ओवी**

वसिष्ठ बोले दशरथ राजा
रविवंशी विजय तुझा
पुण्य लोकी भूभुजा
महावीर तूच राजा
गुरू म्हणे अजपाल सुता
मृगयासी जावे आता
ऐकून दशरथ गुरूचे वचन
मनी आनंदला अजपाल नंदन
साष्टांग नमस्कार करून
मृगयासी चालला तेथून

अनुक्रमणिका

**दशरथ विसर्जन**

तारे रामा तारे देवा। ...

**वशिष्ठ विसर्जन**

जय हरी विठ्ठल विठ्ठल विठ्ठल। ...

**श्रावण माता पित्यासहित प्रवेश**

अहा रे माझ्या श्रावणा ...

**संभाषण**

अहा रे माझ्या श्रावण श्रावणा
काशीला जाती बाह्मण तिघेजण

**ओवी**

माता ती बोले श्रावण बाळाला
तहान लागली तुझ्या पित्याला
पाणी आणुनि पाजी या वेळा
अहा रे बाळा श्रावणा
ऐकुनी श्रावण बोले मातेला
कैसे टाकुनी जाऊ तुम्हाला
ऐसे बोलुनी शेला साडिला
कावड बांधली वृक्ष फांदीला
ती पाहिली कावड वृक्ष फांदी
माता पिता त्यामध्ये
अहा रे माझ्या श्रावणा । श्रावण ...

**ओवी**

वृक्ष पिडिता तेविता वृक्ष अनेक
जल शोधिता सूर कोषण देख
अहा रे माझ्या श्रावणा । श्रावणा ...

अनुक्रमणिका

**ओवी**

श्रावण झारी बुडवू लागला
दशरथ आवाज कानी ऐकिला
निर्वाण बाण सोडूनि दिला
रामा रे रामा हरी हो रामा
श्रावण बाळाच्या उदरी भेदला
रडत बाळ भूवरी पडला

कोणा स्वभाग्याचा बाण
करिता आला राम स्मरण
शर भेदिता म्हणे राम राम
तारी गा श्री हरी मज लागून
ऐकून दशरथ मनी कोचला
म्या बाळ अवचित वधिला
कोणाचा कोण आहेस तू बाळा
निवेदन करी गा मज या वेळा

**शोक दशरथाचा**

अहा गुरुनाथा धावा वेगी आता
या सुंदर बाळाचा वध केला म्या आता

**ओवी**

राजा शोक न करी या वेळा
पाणी पाजावे माझ्या आई बापाला
आता राजा एक युक्ती करावी
मज विष्णूलोकी पाठवावे
दशरथ काढी शर आपुल्या हाते
तो ही पावला विष्णू सायोज पंथें
पाहूनी राजा दुःखी जाहला
पाणी घेऊनी सत्वर निघाला

**दशरथ पाणी घेऊन जातो**

तारे रामा तारे देवा ...

अनुक्रमणिका

**ओवी**

कावडी पाशी उभा राहिला
झारी नेऊनी देऊ लागला
माता ती बोले रात्रीच्या वेळा
काय कष्ट झाले बाळा तुजला
ऐकून राजासी गहिवर आला
झालेला वृत्तांत कथन केला
मला मृग असे भासला
मी मृगावर बाण सोडला
शर श्रावणाच्या ह्रदयी भेदला
श्रावण विष्णू लोकी पावला

**शोक वसुदेव व रूक्मीणीचा**

अहा रे माझ्या श्रावणा पाडसा
पुण्य त्वा केले आम्हा दाही दिशा
अहा रे बाळा आता कोणाची आशा
वृध आणाया इच्छिले येथे सोडिले परदेशा
अहा रे देवा आम्ही कोणाचे काय केले
गडबडा धरणी माय बाप लोळे

**शोक**

पाहुनी राजा बोलतो सन्मुख
करी जोडूनी चरणी ठेवितो मस्तक
माते तू काही न करी गे शोक
प्रसन्न करीन बाळा श्रावणा सारिखे

**ओवी**

ती ही सत्वर शापिली राया
हे पुत्र निर्विली शीघ्र काया
तू पुत्र पुत्र करुनिया
प्राण जाईल तुझा राया
म्हणे अस्ते चित्ती कल्याण माते
चित्ती तृपती पावे एकांते

अनुक्रमणिका

**तिघाचे दहन**

राजाने एक युक्ती योजून
तिघाचे केले दहन

**वशिष्ठ प्रवेश**

जय हरी विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ...

**तिघी राण्या सभा प्रवेश**

चंदना घाली पियो । चंदना घाली ... ...

**संभाषण**

**ओवी**

तिघी राण्या झाल्या गर्भिष्ठ
कौसल्या सुमित्रा कैकयी महालात
तो वसिष्ठ येऊनी बोले दशरथा
डोहाळे तिघीशी पुसावे आता
ऐकूनी गुरूचे वचन
मनी आनंदला अजपाल नंदन
साष्टांग नमस्कार करून
राजा चालला तेथून

तारे रामा तारे देवा । ...

**ओवी**

कैकयी सदनी प्रवेशला
मंचकी बैसली पाहिले डोळा
तिने देखिले अजपुत्राला
तात्काळ पहुडले या वेळा
म्हणे कैकयी सुंदरी
काय डोहाळे होता मनांतरी

अनुक्रमणिका

**पद**

सुंदरपणाचा अभिमान मला
रक्षी या बालका सुदर्शना

**ओवी**

तेथून निघाला अजपाल नंदन
जाता झाला सुमित्रा सदनी

तारे रामा तारे देवा ।...

**ओवी**

सुमित्रा सदनी प्रवेशला
मंचकी बैसली पाहिले डोळा
तिने पाहिले अजपाल सुता
पदांजूळ जोडिले दोन्ही हस्त
म्हणे सुमित्रा सुंदरी
काय डोहाळे होता मनांतरी

**पद**

प्राणनाथा ऐसे वाटते जीवासी
वडिलाची सेवा अहर्निशी
आवडे हे एक नावडे अनेक
सत्य हेची आता माझी भाक

**ओवी**

ऐकून सुमित्राचे वचन
मनी आनंदला अजपाल नंदन
म्हणे सुकुमार सत्य वचन
डोहाळे तुझे होतील पूर्ण
तेथून निघाला अजपाल नंदन
जाता झाला कौसल्या सदनी

तारे रामा तारे देवा ।...

अनुक्रमणिका

**ओवी**

राजा पाहे कौसल्याते
ती ब्रह्म समाधी दिसते
जवळी उभा दशरथ
पाहे तटस्थ त्या क्षणी
राजा तेव्हा कौसल्या देख
कोण आहे मज ओळख
राजा म्हणे ओळख सोडिले
महाभूते संपूर्ण घेतले

**पद**

आणी रे धनुष्य मारीन रावणा
लंका बिभिषेना देईन मी
अंगद सुग्रीव जांबुवंत वीरा
हनुमंता पाचारा लवकरी
टाकुनी पर्वत बुजवारे सागरा
पायवाट करा जावयासी
लंके पुढे मोठे माझे वीण रण
तोडीन बंधन सुरवराचे
विश्वामित्र याग नेईन मी सिद्धी
मारीन कुबुद्धी दोघा जणा
खरदूषणांचा घेईन मी प्राण
धनुष्य मोडीन भुजा बळे
ध्याती मज त्याची बहुत आवडी
न विसंबे घडी त्यासी एक
बोलिला वाल्मिक तैसेच करीन
वर्तोन दावीन नामा म्हणे

**ओवी**

कौसल्यासारखे निदान पाहिले
महाभुते धाटले ओळख सोडिले

**शोक दशरथाचा**

शिव शिव नारायण । धाव मन मोहना
वैकुंठवासी देवा परमेशा जग पालना

अनुक्रमणिका

**वसिष्ठ सभा प्रवेश**

जय हरी विठ्ठल ।...

**ओवी**

वसिष्ठ बोले दशरथा
सर्वं भुते झडपिली आता
चार पुत्र येतील जन्मास
असे भरलिया नवमास
सूर्य वंशी जगन्निवास
सूर्यवारी अवतार होतील

**वसिष्ठ सभा विसर्जन**

जय हरी विठ्ठल ।...

**म्हालदार सभा प्रवेश**
जय अजपाल नंदन । सूर्यवंशी विजय पूर्ण

**ओवी**

झाले पुत्र कुळी दशरथा
म्हणे चला पाहू कौतुक

**म्हालदार विसर्जन**

जय जय रघू नंदन । आनंदले भक्त जन

**राण्या व म्हालदार सभा प्रवेश**

चंदना घाली पियो । चंदना घाली...

**ओवी**

भूपाजवळी उठुनी समान केला तया
देखूनी आनंदला पद भूज त्या राजया

अनुक्रमणिका

**वशिष्ठ प्रवेश** (जातक वर्णन)
**सर्व मिळून पाळणा गातात**
**सर्व सखी विसर्जन**
**व**
**तिघी राण्या विसर्जन**

चल सखे जाये राधा । चल सखे जाये...

**म्हालदार प्रवेश**

अस्तके तो महाराजा ।...

**संभाषण**

**म्हालदार विसर्जन**

जय जय रघुनंदन । आनंदले ऋषी गण

**म्हालदार व रामलक्ष्मण प्रवेश**

रघूराया है पालक राया हो रघूराया
वेळ नको लावू लोट उपकार्या
लीला अवतार करी गा राया । रघुराया

**विश्वमित्र सभा प्रवेश**

गोविंदराम गोविंदराम ।...

**संभाषण**

**ओवी**

दशरथ म्हणे विश्वामित्राते
कैसे येणे केले नगराते
कौशिक दशरथापाशी येऊन
वचन मागितले पाहिले जाणून
पूर्वीचे दिधले वचन
कृपा करावी मज लागून
विश्वामित्र म्हणे ऐक पुढती

अनुक्रमणिका

सांगतो ऐक मज प्रती
बारा गाव एक स्तन
दीड गाव तिचे वदन
ती कुंभकर्णाची ज्येष्ठ बहीण
होम विद्वास करी येऊन
अजपाल सुत रविवंशी कुळभूषणा
रघुवीर देई मम रक्षणा

**पद**

नका नेऊ हे राघव राना हो
ऋषी काही तरी येऊ द्या हो करुणा
अन्न पाण्याचा प्रात करीन
अजून बालक तान्हा हो। ऋषी काही तरी...
धनुर्विद्या शिकले हो नाही
अजुनी पीत आहे पान्हा हो। ऋषी काही तरी...
चापकूर प्रभु दशरथ धावुनी
लागे कौशिका चरणी हो। ऋषी काही तरी...

**ओवी**

मी नाही मागितले काय येथे
तू बोललासी माग यतार्थ
तू सूर्यवंशी जगन्निवास
डाग न लावी सूर्य वंशास

**छंद**

हरिश्चंद्र सत्यवानी
वाहे डोमा घरी पाणी
स्त्री पुत्रासी विकुनी
सिद्ध केले सत्य वचनी

सत्व सागर श्रीयाळ जाण
चिलया सारिखे निदान
ऋषी दिधले भोजन
सत्व राखिला संपूर्ण
ऐसे सांगता आणिक
थोर थोर पुण्य लोक

अनुक्रमणिका

तुझ्या सारिखा नाही एक
सत्व जाई तुझ्या देख

**ओवी**

कल्याण असो तुझे श्रीराम
मी जातो आपुल्या आश्रमा

**विश्वामित्र विसर्जन**

गोविंद राम गोविंद राम ।...

**ओवी**

उलंघुनी द्वारासी तेथ
बाहेर निघाले गुरूनाथ

**वशिष्ठ प्रवेश**

जय हरी विठ्ठल ।...

**ओवी**

वसिष्ठ बोले दशरथाप्रती
क्रोधे मुनी गेले पंथी
राम लक्ष्मण देई त्वरीत
डाग न लावी सूर्यवंशास
दशरथ धावे ऋषी मागुनी
म्हणे थांबा कौशिक मुनी
न्यावे राम लक्ष्मण
तुम्हासी करतो अर्पण
रघूवीर दिधले मुनी कारण
सर्व देव दुजारण

**दशरथ, भरत व शत्रुघ्न सभा विसर्जन**

तारे रामा तारे देवा ।...

अनुक्रमणिका

**पद—विसर्जन**

पुढे विश्वामित्र जाण पाठी राम लक्ष्मण
हाती घेऊन धनुष्य बाण
चाले हालत डोळत राया हो । रघूराया ।...

**प्रवेश**

रघूराया हे पालक राया हो रघूराया
वेळ नको लावू लोट उपकार्या
लीला अवतार करी गा राया हो रघूराया ।...

**वसिष्ठ प्रवेश—रामास उपदेश**

**ओवी**

विश्वामित्र म्हणे रघूनाथा
आड मार्ग चला आता
आड मार्ग म्हणता आपण
त्या मार्गी भय कोण
विश्वामित्र म्हणे राक्षसीण
भय वाटते मजलागून
बारा गाव एक स्तन
दीड गाव तिचे वदन
ती कुंभकर्णाची ज्येष्ठ बहीण
होम विद्वास करी येऊन
ऐसे संवादता दोघे जण
आरड फोडिली गर्जून

**नाटिका प्रवेश**

गोकुळ मंडळ वीरा । राया रघूवीरा रघूवीरा...

**संभाषण**

थैयो की राम थय । थैयो की राम थय...

अनुक्रमणिका

**ओवी**

विश्वामित्र भयभीत होऊन
रक्षी रक्षी राघवा मजलागून

गोकुळ मंडळ वीरा राया रघूवीरा रघूवीरा

**ओवी**

करूनी ताटिकेचे हरण
सिद्ध नेले यज्ञ अजून

**ताडिकेस घेऊन जातात**
असती असती चालना । ताटिकेस घेऊन

**ओवी**

तिचे बंधू सुबाहू मलिच्छ चौघेजण
प्रलय करतील येऊन
विश्वामित्र म्हणे रघुनाथा
तुम्ही यज्ञ रक्षावे आता
मी पळून जातो स्वर्ग लोका
राक्षस भय वाटते मका

**विसर्जन**

रघूराया हे पालक राया हो रघूराया...

**म्हालदार प्रवेश**

अस्तके तो महाराजा...

**संभाषण**

**सुबाहू मरिच्छ प्रवेश**

एके तांब तादे के एके तांब थैयो

अनुक्रमणिका

**भोजन, विद्या, तमासा व बहीणीचा शोध**

**शोक**

ड ड बाबा रे ड...

**विश्वामित्र, राम लक्ष्मण प्रवेश**

रघू राया हे पालक राया...

**रामलक्ष्मण व दैत्यांचे युद्ध**

थैयो की राम थैय । थैयो की रामथय...

**ओवी**

सुभाऊ मरिच्छ मारून
सिद्ध केले यज्ञ अजून

**पद**

पुढे विश्वामित्र जाण । पाठी रामलक्ष्मण
हाती घेऊन धनुष्य बाण ।...

**ओवी-शीला प्रवेश**

अरण्य क्रीडा करीत जाण
अहिल्या शीला देखून

राम होऊनीया खिन्न
आश्चर्य वाटते शीला पाहून
मज पाहती शीला दुरून
झाली भय भीत पाहून

**पद**

रामा कौतुक पाहसी काय
उद्धरी मुनी द्वारा
अज्ञानाने घडले पाप

अनुक्रमणिका

कोपुनी मुनीने दिधला शाप
सदय दूर करी संताप
तू मायबाप दिनाचा । रामा...
ऐकुनी उठला तो रघूराय
धरिला गौतम वधूवरी पाय
केला सर्वही दूर अपाय
हर्ष न माय मुनिला हो । रामा...

**ओवी**

अहिल्या शीला राघवे मुक्त केले
पद लागता दिव्य होऊन गेले

**गौतम ऋषी प्रवेश**

**पद**

रामचंद्र दयाळा त्रिलोक्य प्रतिपाला हो । रामचंद्र
सर्व दुष्टाचा संहार केला
महा संकट उद्धारीला हो । रामचंद्र...

**अहिल्या सभा विसर्जन**

चाले सखे जाये राधा ।...

**पद-विसर्जन**

रघूराया हे पालक राया हो रघूराया ।...

**म्हादार प्रवेश**

अस्तके तो महाराजा ।...

**संभाषण**

**जनक राजा प्रवेश**

गोविंदा रामा थैय थैय था ।...

अनुक्रमणिका

**संभाषण**

तारे रामा तारे देवा ।...

**वृद्ध ब्राह्मण प्रवेश**

जय हरी विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ।...

**संभाषण**

जय हरी विठ्ठल ।...

**ओवी**

विदेही नगरी राजा जनक
तेथे ब्राह्मण आला एक
दिला आशीर्वाद विधियुक्त
रामा रे रामा हरी हो रामा
राजा म्हणे गा द्विज वरा
कोठून येणे झाले ह्या नगरा
काही आज्ञा हे किंकरा
सांगा वेगी मजला खरा
येरू म्हणे गा राजेश्वरा
मी वृद्ध झालो अवधारा
भिक्षा करी गा साचरा
मनोरथ माझे करी गा पुरा
राजा म्हणे या द्विजोत्तमा
काय इच्छा आहे तुम्हा
येरू म्हणे गा राजोत्तमा
भूमी दान देगा आम्हा
राया संकल्प करूनी पुरा
ब्राह्मणाशी दिधला धारा
त्याने त्या स्थळी जुंपिला नांगर
ऋषी कर्म आरंभिले सत्वर

**ताल**

शिव शंभा शंभा । सदा शंभा शंभा

अनुक्रमणिका

**ओवी**

नांगर लागता भूमीशी
दात अडकले पेटीशी
विप्रे पाहे विप्रित
तोच पेटित रत्न खंचित

अबला सहित विप्रेचे मन
संकष्टी पिकले ते आपुले जाण
म्हणुनी पेटी उचलून
रामा रे रामा हरी हो रामा
म्हणे मज राये दिधली भूमी दान
त्या माजी सापडलिया धन

जय हरी विठ्ठल।...

**ओवी**

पेटी नेऊन त्या क्षणी
जनकापाशी केली अर्पण
राजा उघडोनी पाहे पेटी
तो कन्या रत्न देखिली दृष्टी
मी हे उपजली सृष्टी
न समाये आनंद पोटी

**ब्राह्मण जातक वर्णन**

**ओवी**

पहिले नाम वेदावती
दुसरे नाम पार्वती
तिसरे नाम सीता सती
चौथे जानकी परियेसती

**ब्राह्मण विसर्जन**

**ओवी**

सप्त वर्षे होती तियेसी

अनुक्रमणिका

पुढे कथा वर्तली कैसी

**परशुराम प्रवेश**

रविकुळ मंडणा थैय थैय था
रविकुळ मंडणा येई गा भार्गव कुळ भूषणा।....

**संभाषण**

तारे रामा तारे देवा।....

**परशुराम व जनक यांचे संभाषण**

**महालात जातात**

तारे रामा तारे देवा।.....

**ओवी**

धनुष्य ठेवुनी सभेत
राजे पातले मंदिरात

**सीता प्रवेश**

चंदना घाली पियो चंदना घाली।...
जिता मातादे जिता माता दे।....

**ओवी**

धनुष्याचा घोडा करूनी येथ
फेरा फिरविला सर्व नगरात

जिता मातादे जिता मातादे

**परशुराम व जनक सभा प्रवेश**

जो कर्तमान चापाचा भला
तो राजा सभेसी पातला

अनुक्रमणिका

**सीता जाते**

**ओवी**

राये पाहता क्रोध भरले
सूचना केली जनका वहिले
म्हणे धनुष्य बिघडिले
हे कन्याने केले या वेळे

**जनक सीतेस हाक मारतो**

चंदना घाली पियो चंदना घाली ।.....

**संभाषण**

चंदना घाली पियो चंदना घाली ।....

**विसर्जन**

चल सखे जाये राधा चल सखे जाये ।....

**ओवी**

ह्या धनुष्याचा पण मांडवा
मेळवावे सकळ भूदेवा
धनुष्य दुखंड करीत मानवा
तयासी कन्या अर्पावी

**परशुराम विसर्जन**

तारे रामा तारे देवा।....

**ओवी**

ऐसा सांगुनिया वृत्तांत
स्वस्तला गेला रेणुका सुत
जनक राया त्या वेळा
मनी विचार पै केला

अनुक्रमणिका

**सीता व दासी सभा प्रवेश**

चंदना घाली पियो चंदना घाली।....

**ओवी**

तिचे मांडिले स्वयंवर
पत्र धाडावे सकळ नरेंद्र

**म्हालदार प्रवेश**

अस्तके तो महाराजा ।...

**संभाषण**

**ओवी**

पत्र देऊनिया दूत
पाठवावे कर्दळी वनात

**म्हालदार जातो**

अस्तके तो महाराजा ।....

**रामलक्ष्मण प्रवेश**

रघूराया हे पालक राया ।....

**म्हालदार पत्र द्यावयास येतो**

अस्तके तो महाराजा

**ओवी**

पत्र घेऊनिया दूत
पाठविले कर्दळी वनात

अनुक्रमणिका

**म्हालदार विसर्जन**

अस्तके तो महाराजा ।....

**ओवी**

ऋषी वाचिता पत्र जाण
ऐकता होय रघूनंदन
म्हणे नवल अति दारून
पहायासी येऊ तुम्हा सांगातीण

**पद**

स्वामी न्यावे आम्हासी । मिथिला नगरासी हो
कैसा तो स्वयंवर पाहू सीतेचा
अत्यंत हे नवलासी हो । स्वामी न्यावे...
कोण्या भूपाळा घालील माळा
हे कौतुक पाहू डोळा हो । स्वामी न्यावे...
राजे मिळतील कोटी न कोटी
त्यांची आमुची होतील भेटी हो । स्वामी न्यावे....
दशरथ तात काय म्हणे ना
हे सत्य हे जाणा हो । स्वामी न्यावे....

**ओवी**

ऐसे म्हणता रघूवीर
मनी तोषला ऋषीश्वर
सांगाती घेऊनी दशरथ कुमार
मिथिला भुवनी जाती सत्वर

**पद**

रघूराया हे पालक राया हो रघूराया।....

**ओवी**

ऋषी येता सभेत
राजा आला धावत
आसन देऊनी त्वरीत

अनुक्रमणिका

जवळी बैसविले सभेत

जनक पाहता दशरथ कुमार
मनी तोषला अफार
म्हणे देवा तीत श्री शंकर
जामात ऐसा देई वर

**पद**

जनक राजा ऋषी प्रती बोले
हे दोघे बालक कोठून आले
कोणापासून उत्पन्न झाले
ह्यासी पाहाता नेत्र निर्मिले

**पद**

ऋषी म्हणे ऐक नृपती
ह्यांची अयोध्या पुरी वस्ती
लहान तुम्हासी दिसती
परि मोठी यांची कीर्ति
राजा दशरथ यांचा पिता
राणी कौसल्या यांची माता
यांनी रक्षिले मज यज्ञासी
म्हणुनी आणिले लग्नासी

**इंद्र चंद्र सभा प्रवेश**

गोविंदा रामा थैय थैय था।...

**संभाषण**

तारे रामा तारे देवा।....

**ओवी**

मग त्या स्वयंवरा निमित्त
सकळ राजे आले धावत

अनुक्रमणिका

**म्हालदार प्रवेश**

निरा धनको धनुराज ।...

**संभाषण**

**रावण प्रवेश**

सभा घटमो रामोजय ।...

**संभाषण**

**पद**

ह्या जगामध्ये मी एक श्रेष्ठ रावण रावण
ह्या सभेकारण येणे झाले माझे प्रयन प्रयन

पुलस्ती पुत्र मी रावण प्रतावीर विख्यांत जाण
धाके कापती सर्व जन त्रिलोक्याचे

ऐसा श्रेष्ठ मी दशाशीर मजसी भितो शंकर
इंद्रादिक सर्व सूर मज भेणे लपती

विमान माझे जाते गगनी गळबळा ऐकिले कानी
ह्या कारणे पाताळ अवणी म्या रावणाने

**ताल**

लंका पती आले हो।.....

**ओवी**

मग त्या स्वयंवरा भितरी
रावण देखिली राजकुमारी
म्हणे जिंकावी स्वयंवरी
ऐसी मनाची आवडी

तव जनक करी विनंती
स्वामी पण आहे निश्चिती

अनुक्रमणिका

कन्याचिया मनोरथ
कोधंड हे आले येथे

रावण म्हणे नृपती
माझी तुज नकळे शक्ती
मी सांगतो हे पुढती
तुम्ही ऐका मज प्रती

मेरू पर्वताची करूनी पुरी
आकाशाची करूनी घडी
समुद्र करूनी कोरडा
ऐसी मनाची आवड

**पद**

म्या प्रसन्न केला शिवभोळा माझा भय कैकाला
इंद्रा हाती गुंफिल्या माळा म्या रावणाने
द्वारी दीनकर कर जोडी धाके वायू घर झाडी
अग्नी हाती धुवविल्या लुगडी म्या रावणाने

खंडूदेव ज्याचे नाव नित्य नेम हर्ष दावे
गणपती हाती राखिल्या गाई म्या रावणाने

ब्रह्म होऊनीया वेडे मज पुढे वाचे पातडे
खुळ खुळ केले देवाचे हाडे म्या रावणाने

पुण्य प्रतापी मी ऐसा हलविले गिरी कैलासा
जनकाचा पण मानावा कैसा म्या रावणे

त्र्यांबक धनुष्य हे काय मसक समान जग पाहे
गोसावी नंदन पुजिले पाय म्या रावणाने

राम मानवा वा पुढे मज पुढे केवळ घुंगुरे
खुळखुळ केले देवाचे हाडे म्या रावणाने

**ताल**

लंकापती आले हो।

अनुक्रमणिका

**पद**

कोण तुझ्या मनासी येतो । सांग ग सीते
पहिली कुसुंबी दुस्तर शाला । बाई तो काही नव्हे
विरादी हरहर दपकर ज्याला । बाई तो काही नव्हे
मात मडळ झळकत गेला । बाई काही नव्हे

मेघश्याम श्रीराम मनोहर । तेव्हा म्हणे नव्हे
दशरथ नृपती राजे धनुर्धर । तेव्हा म्हणे नव्हे

रघुवीर म्या प्राणी आला ग बाई रघुवीर म्या प्राणी आला
राघव म्या प्राणी आला ग बाई राघव म्या प्राणी आला
ह्या विरहीत भूपाल सखे ग सर्व जनका समान मला
राघव म्या प्राणी...

तळमळ बहू लागली धरणीवर पडियली
सकळ सखया धावती । एक सावध बैसविती
एक नेत्री पाणी लावती । एक मंजूळ वारा देती
एकसुख वचन बोलती । जर जर गात्र कापती
ॐकार म्हणूनी अती शोक मांडिला
राघव म्या प्राणी आला....

अग सखयांनो तुम्ही जा जा । मम जनकासी सांगा
म्या आवडिला राम राजा मी अंतर त्याची भाजा
सांडी सांडी हा पण । कठीण धनु हे जाण
ह्यासी चढवील कैसा गुण । मी त्यागीन आपला प्राण
ॐकार म्हणुनी जा जा अति शोक मांडिला
राघव म्या प्राणी आला ।...

**पद**

भाबड भूत मोहित केले उपचूर चोळी
उतावळा तो रावण मेला आता चापाजवळी

**धावा**

शिवाय एवढे विघ्न निवारी हो । - (२)
हा लंकापती अपमान मानुनी धनु हे पाडी उरावरी
त्रिपूर भवानी सुंदरी हो । -(२)

अनुक्रमणिका

चौषष्ट योगिनी सुंदरी- (२)
हा लंकापती अपमान मानुनी धनु हे पाडी उरावरी

**ओवी**

चिंता फार करी मनी जनक तो ही जानकी नवरी
द्यावी त्या रघूनायका खरे वाटे मला अंतरी
केला मी पण हा परंतू धनु हे वरील कैसा परी
गोसावी सुत स्वामी राजा नृपती रामा यतो क्षनमः

**ताल**

सभा घटमो रामोजय ।....

**ओवी**

क्रोधे रावण उठला
मग सभेपुढे उभा राहिला
पायी चाप पराक्रम उचलिता
भूभीवरी रेटला
नाकी तोंडी रूधीर वाहातसे
तया स्थळी लोळिला
गोसावी सुत स्वामी राजा नृपती रामायती क्षनमः

**आर्या**

अपमान जनकाचा रामा अपमान जनकाचा
रावण सभेशी पहा कैसा केला
दशशीर वीस भुज्याच्या रामा । दशशीर...
गर्व तयाचा पहा कैसा गेला
रामा रामा रामा रामा हो।...

रावण हाक मारी रामा रावण हाक मारी
धनुष्य पडले माझ्या उरावरी
धावा धावा करी रामा धावा धावा करी
धनुष्य काढा माझ्या उरावरी
रामा रामा रामा रामा हो ।

अनुक्रमणिका

**पद**

प्रधान आला भूपाजवळी । काहो तुम्ही उठा
चाप योजा गुण तुम्हा, वरील ती सीता

अंगी हा असे पूर्ण जोडला । काहो तुम्ही उठा
चाप योजा गुण तुम्हा । वरील ती सीता

कर जोडूनी विनवितो आता । काहो तुम्ही उठा
चाप योजा गुण तुम्हा । वरील ती सीता

**श्लोक**

विश्वामित्र म्हणे रघुत्तमा वीरा तू नवरा साजिरा
घे गा त्र्यंबक चाप ओढुनी करे सीतेसी तू नवरा

श्री रामे गुरू वंदिला मग सभेपुढे उभा राहिला
गोसावी सुत स्वामी राजा नृपतो रामा यतो क्षनम:

**ताल**

रघुराया हे पालक राया।...
सभा घटमो रामोजय

**रावण व राम यांचे संभाषण**

**ओवी**

रामाचे चरित्र भरिते कोट्यवधी गाई जे
शत्रू ते अहिते पवित्र महिते सीता चित्ती साहिजे
बंधूंची रचिते मुमुख उचिते दावी जना सचिते
गोसावी सुत स्वामी राजा नृपतो रामायतो क्षनम:

रघू राया हे पालक राया।...
जय राम कथा लीला बहुभो । जय राम कथा लीला

**पाळणा रामाचा**

बाळा जो जो जो रे कुळभूषणा । दशरथानंदन ॥

अनुक्रमणिका

निद्रा करी बाळा मन मोहना । रामा लक्ष्मणा ॥ धृ ॥

पाळणा लांबविला अयोध्येसी । दशरथाचे वंशी ॥
पुत्र जन्मला ऋषीकेशी । कौसल्याचे कुशी ॥ १ ॥

रत्नजडित पालक । झळके अमोलिक ॥
वरते पहुडले कुळदीपक । त्रिभुवननायक ॥ २ ॥

हालवी कौसल्या सुंदरी । धरूनी ज्ञान दोरी ॥
पुष्पे वर्षिली सुरवरी । गर्जती जयजयकारी ॥ ३ ॥

विश्वव्यापका रघुराया । निद्रा करी बा सखया ॥
तुजवर कुरवंडी करूनिया । सांडिन आपुली काया ॥ ४ ॥

येऊनि वसिष्ठ सत्वर । सांगे जन्मांतर ॥
राम परब्रह्म साचार । सातवा अवतार ॥ ५ ॥

याग रक्षुनिया अवधारा । मारूती रजनीचरा ॥
जाईल सीतेच्या स्वयंवरा । उद्धरी गौतम दारा ॥ ६॥

पर्णिल जानकी सुरूया । भंगुनिया शिवचापा ॥
रावण लज्जित महाकोप । नव्हे पण हा सोपा ॥ ७ ॥

सिंधू जळ होडी अवलीला । नामे तरतील शिला ॥
त्यावरी उतरूनिया दयाळा । नेशी वानर मेळा ॥ ८ ॥

समूळ मर्दूनी रावण । स्थापिल बिभीषण ॥
देव सोडवील संपूर्ण । आनंदेल त्रिभुवन ॥ ९ ॥

राम भावाचा भुकेला । भक्ता धीन झाला ॥
दास विठ्ठले ऐकिला । पाळणा गाईला ॥ १० ॥

[अनुक्रमणिका](#)

**पाळणा**

हळू हळू गाई निजरे बाळा
मोठा जट्टा धारी गोसावी आला
स्वरचर भुजा जारे फकिरा
निजला माझा पालखी हिरा

नको येऊ रे बागुल बाबा
निजला माझा पालखी रावा
सगुण गुणाचे बालक माझे
कोणी दावा हो यासम दुजे

लागली दृष्टी कोण्या पापिणीची
उतरे प्रभा मुख चंद्राची
हालवी कौसल्या प्रेम पान्हा
दास म्हणे आला वैकुंठराणा

अनुक्रमणिका

## अमर भूपाळी

घन श्याम सुंदरा श्रीधरा अरूणोदय झाला
उठि लवकरि वनमाळी उदयाचळी मित्र आला ॥ धृ. ॥

सायंकाळी एके मेळी द्विजगण अवघे वृक्षी
अरूणोदय होताच उडाले चरावया पक्षी

अधमर्षणादि करूनि तापसी तपाचरणदक्षी
प्रभात काळी उठुनि कापडी तीर्थ पंथलक्षी
करूनि सडासमार्जन गोपी कुभ घेऊनि कुक्षी
यमुना जळासी जाती मुकुंदा दध्योदन भक्षी
मुक्तता होऊ पाहे कमळिणी पासुनि भ्रमरा
पूर्व दिशे मुख धुतले होतसे नाश तिमिरा
उठि लवकरि वनमाळी उदयाचळी मित्र आला ॥ १ ॥

घरोघरी दीप अखंड त्यांच्या सरसावुनी वाता
गीत गाती सप्रेमे गोपी सदना येती जाती
प्रवंर्तोनि गृहकामी रंगावळी घालु पाहती
आनंद कंदा प्रभात झाली उठ सरली राती
काढि धार क्षीरपात्र घेऊनी धेनू हंबरती
द्वारि उभ गोपाळ हाक मारूनि तुजला बाहती
हे मुक्ता हार कंठी घालि या रत्नमाळा
हाती वेत्रयष्टी बरवी कांबळा घेइ काळा
ममात्मजा मधुसूदना ऋषीकेशी जगत्पाळा
लक्षिताती वासुरे हरि धेनुस्तनपानाला
उठि लवकरि वनमाळी उदयाचळी मित्र आला ॥ २ ॥

प्रातः स्नाने करूनि गोपिका अलंकारे नटती
कुंकुमादि चर्चुनी मंथना लागी आरंभिती
प्रेमभरित अंतरात वदनी नामावळि गाती
अर्घ्यदान देउनिया द्विजगण देवार्चन करिती
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णुपूजा समर्पिती
स्मार्त शिवार्चन सक्त शक्तीते शाक्तही आराधिती
ऋषिगण आश्रमवासी जे निरंजनी धाले
अरूणोदयि अपुलाले ध्यानी निम्न झाले
पंच पंच उषःकाली रविचक्र निधो आले
एवढा वेळ निजलासी म्हणुनी हरि समजेल नंदाला
उठि लवकरि वनमाळी उदयाचळी मित्र आला ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

विद्यार्थी विद्याभ्यास्तव सादर गुरुपायी
अध्यापन गुरू करिती शिष्यही अध्ययना उदयी
याज्ञिक जन कुंडामधि आहुती टाकिताती पाही
रविप्रभा पडुनिया उजळत्या शुद्ध दिशा दाही
हे माझे पाडसे मावळे ऊठ कृष्णाबाई
सिद्ध सवे बळिराम घेउनि गोधने वना जाई
मनिजन मान सहंसा श्री मनःकमल भुंगा
मुरहर पंकजपाणी पद्मनाथ श्रीरंगा
शकटान्तक सर्वेशा हे हरि प्रताप तुंगा
कोटि रविहुनी तेज आगळे तुझिया वदनाला
होनाजी बाळ नित्य ध्यातसे हृदयी नाममाळा ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

## आरती दशावताराची

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥
भक्त संकटी नाना स्वरूपी स्थापिसी स्वधर्म ॥ धृ ॥
अंबकऋषिकारणे गर्भवास सोशिसी ॥
वेद नेले चोरुनि ब्रह्मया आणुनिया देसी ॥
मत्स्यरूपी नारायण सप्तहि सागर धुंडिसी ।
हस्त लागता शंखासुरा तुझा वर देसी ॥ १ ॥
सुरासुर मिळुनिया सागर मथियेला
मंदराचल रवी दोर हा वासुंकी केला
भारे करून पृथ्वी तेव्हा जाई रसातळा
कूर्मरूप धरूनी श्वबतो पृष्ठावर धरिला ॥
रसातळासी जाता पृथ्वी पाठीवर घेसी
परोपकारासाठी देवा कासव झालासी
दाढे धरूनी पृथ्वी नेता वराहरूप होसी
प्रल्हादाकारणे स्तंभी नरहरी गुरगुरसी ॥
मातला राक्षस उपद्रव केला सकलासी
अज्ञान गादी करी प्रसुनी बदली विप्रासी
उचलून ज्ञात झाला पृथ्वी दैत्य हिरण्यक्षी ॥
पावचे अवतारी बळीच्या द्वाराला जासी
भिक्षे स्थळ मागुनी बळीला पाताळा नेसी
सर्व समर्पण केले म्हणुनी प्रसन्न त्या होसी
वामनरूप धरूनी बळिच्या द्वारी तिष्ठिसी ॥
सहस्त्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला
कष्टी ते रेणूका म्हणुनी सहस्त्रार्जुन वधिला
निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला
सहावा अवतार परशुराम प्रगटला ॥

मातला रावण सर्वा उपद्रव केला
तेहतीस कोटी देव बंदी हरिले सीतेला
पितृवचना लागी रामे वनवास केला
मिळोनि वानर सहित राजा राम प्रगटला ॥

देवकी वसुदेव बंदी मोचन त्वा केले
नंदा घरी जाऊनी निजसुख गोकुळा दिधले
गोरस चोरि करिता नवलक्ष गोपाळ मिळविले
गोपिकांचे प्रेम देखुनी श्री कृष्ण भुलले ॥

बौद्ध कलंकी कलियुगी अधर्म हा अवघा

अनुक्रमणिका

सांडुनी नित्य धर्म सोडुनी नंदाची सेवा
म्लेंच्छमर्दन करिसी म्हणोनी कलंकी केशवा
बहिरवि जान्हवि द्यावि निजसुखनंदसेवा ॥ आरती

जय कृष्णा लीला बहु भो । जय कृष्णा लीला ।...

राधा खेळे मदन गोपाळ । राधा खेळे मदन गोपाळ (२)
कृष्णाने मुरली वाजवली । राधा गौळण घाबरली (२)
राधा खेळे मदन....
हरिची मुरली सोन्याची । डोईवर घागर पाण्याची (२)
राधा खेळे मदन....

**मंगलाष्टके**

स्वस्ति श्री गणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिध्दितं ॥
बल्लाळो मुरूढं विनायकमहं चिंतामणी स्थेवरं ॥
लेण्याद्रिं गिरिजात्मकं सुखंर विग्घेहरं ओझरं
ग्रामो राजन संस्थितं गणपती कुर्यात सदा मंगलम् ॥

गंगा सिंधू सरस्वतीच यमुना गोदावरी नर्मदा ॥
कावेरी शरयू महिंद्रतनया शर्मन्वती वेदिका
क्षिप्रा वेत्रवती महासूरनदी ख्याता गया गंडकी ॥
पूर्णा पूर्ण जले समुद्र सरिता कुर्यात सदा मंगलम् ।।

विश्वामित्र वसिष्ठ सर्व हे ऋषी आले सीते स्वयंवरा
संगाते रघुराजे पूर्ण विजयी लावुनी त्याचा हिरा
हाती त्रिमुक चाप घेउनी उभा शोभे जस नवरा
गोसावी सुत स्वामी राज नृपतो रामा यतो स्वनना ॥

हर्षे एक सुखे कुरंग नयनी चंद्रानना कमिनी
रामाचे मुख देखताच नयनी तल्लीन झाले मनी
घेती आरती धावती वर्णवती ओवाळिती श्रीपती
गोसावी सुत स्वामी राज नृपतो रामा यतो स्वनमा

रामे त्रिमुक चाप ओढुनी करे मोडुनिया टाकिले
पुष्पांचा वर्षाव देव करिती त्रिलोक आनंदले
सीता येऊनी माळ घालती मळा सर्व सुखे आपुले
गोसावी सुत स्वामी राज नृपतो रामायतो स्वनमा ॥

अनुक्रमणिका

# कशी गाऊ तुझी थोरवी

मी कशी गाऊ तुझी थोरवी
आई मी कशी गाऊ तुझी थोरवी ॥ धृ. ॥

या जगती तूच मला आधार
इथे नाही दुजा मजला निराधार
बोल ओई फिटेल का तुझे उपकार
सर्व जगती मातृमन नीत प्रेमसागर ॥ १ ॥

तू जागजागुनी सतत रात्रंरात्र
अन आम्हा दिलेस ग सुख मात्र
सदा थिजवुनी झिझवुनी तुझी गात्र
तू या जगती केलीस मज पात्र ॥ २ ॥

स्नेहहृदय तुझे, तो वात्सल्याचा
सद्‍द हृदय तुझे, तो कैवळ्याचा
कोमळमन ग तुझे, तो प्रेमळपणाचा
नीत बाळमन घडवतेस तो आनंदाचा ॥ ३ ॥

हे सागरासम खोल तुझे शिकवण
तव प्रेममायेने मम करितेस पावण
हे हृदय तुझे, ममते मधुसदन
ते मज न करवी कधी वणवण ॥ ४ ॥

आहेस संगतिनी माते, तूच बाळाचे
जगती प्रेमसरिता माते, तूच बाळाचे
थोर दैवत माते जगती, तूच बाळाचे
तूच सर्वस्व माते भुवरी, तूच बाळाचे ॥ ५ ॥

आई वाटते मग यावे तुझ्यापाशी
आई ने मला ग ने तव पाशी
आई तुझ्या प्रेमावाचून मी ग उपाशी
आई सांग झगडू किती या अंधाराशी ॥ ६ ॥

मी कशी गाऊ तुझी थोरवी
आई मी कशी गाऊ, तुझी थोरवी ॥ धृ. ॥

**श्री देवजी पादिया चंदावरकर**

अनुक्रमणिका

## प्रभूचरणी विलिन झाल्या पाकल्या

मूळ म्हणे रम्य कळ्यास
का बा तू असा उदास
हृदयी सुगंध करितो वास
मग का तू असा उदास ॥ १ ॥

रम्य पहाटे थेंबे थेंबे
दवबिंदू न्हाती फुले-पानें
उमळती कळी मोहिती मनें
पाकळ्या खुळवी रम्य बने ॥ २ ॥

कळ्या झाल्या गंधयुक्त फुले
पाकळ्या उमलल्या आली पाखरे
पहा मधूकण चाखाया आनंदे
भिरभिरती की बसती तव हृदये ॥ ३ ॥

तव पराग सेवुनी धुंद
भ्रमर झाला कसा गुंग
भरी कसा वाऱ्याशी गंध
वाहती दाहीदिशा अती मंद ॥ ४ ॥

कळ्या आनंदात गुलाब झाल्या
दवबिन्दूत कशा पाकळ्या फुलल्या
फुलल्या उमलल्या सुगंधीत कल्या
पानोपानी उमटल्या कळ्या बहरल्या ॥ ५ ॥

प्रभाते सवितिकिरण त्यावरी नाचे
शुभ्र रत्नासम दवबिन्दूशी खेळे
प्रभूपूजेस्तव वेचल्या हो कळ्या
प्रभूचरणी विलिन झाल्या पाकळ्या ॥ ६ ॥

कवी – **श्री. देवजी पादिया चंदावरकर**

GROS-BOIS ROAD, MARE-D'ALBERT.
MAURITIUS.

अनुक्रमणिका

## बंधन

न शांती कधी लाभते मला
पाहिले जेव्हा पासुनी तुजला
न लागते मन माझे कशातही
करतात आपली थट्टा सारी

असतेस नयना पुढे जेव्हा तू माझ्या
विसरून जातो मी जग सारा
न कशाची आठवण असते मजला
होते काय, न कळते मजला

सखया न त्रास देऊ इतुका मजला
राहुनि दूर करतेस इशारा
न येऊ शकतो मी प्रिया
आहे बंधन आपुल्या पाया

न श्रृंखळा आहे ही कधी सुटणारी
न मिलन होणार आपला कधि ही
आयुष्य निघून जाईल आपली
असे वाटते मजला कधी-कधी

## दूर जातो मी तुझ्या पासुनी

नको पाहू वाट तू आज माझी
चाललो दूर तुझ्या आज मार्गातूनी
न भेट होईल यापुढे आता आमची
अशी तू आपुल्या घे हृदयी

होतो जवली जेव्हा मी तुझा
नावडता होतो मी तुजला
आता अश्रू न ढाल तू आपला
विसरून जा तू यापुढे मजला.

आहे मी गरीब जरीही
आहेस तू सधन सुकुमारी
आहेस तू मज हृदय मंदिरी
विसर न तुझी पडणार कधिही

अनुक्रमणिका

जीवनातून तुझ्या सखया
जातो आहे दूर मी प्रिया
भेट न होईल आमुची पुढे या
आहे तुजला वचन हा माझा

**सदाशिव महादू**
Le Grand Bois Road
MAURITIUS

अनुक्रमणिका

## समुद्राच्या काठी झाडाच्या तळी
## बसलो मी धारा घेऊनी नयनी

सरळ टेकीत तठला आपली मान
सागरी पाहतो उठला मोठा तूफान
विसरलो मी आपले पूर्ण देहभान
दचकलो विमानाचा आवाज ऐकोणी

विचारांच्या लाटा हृदयी जशा हजार
लाटा सागरी तशा उठे किती अपार
किनारा भेटाया किती धावपळ बेजार
जशी तळमळ चाले माझ्या अंतकरणी

वाटे असे कधी वीष एकदा खावे
कधी मम वाटे समुद्री आपले अंत करावे
जगणे माशांचे परि पाहून लगेच समजले
दुखी मीच नव्हे या भव्य देवांगणी

आस्वे मी अलगद आपली पुसली
जवळची सोनेरी वाळू मी सपाट केली
अक्षरे दोनचार सुंदर मी तीत काढली
वाटे जणू लिहावे आपली सारी कहाणी

सोसाट्याचा वारा एकाएक सुटला
वाळूत जणू काय मोठा तुफान उठला
डोळा मी आपला तेव्हा लगेच मिटला
पाहतो जेव्हा पुन्हा तनया माझ्या नयनी

**राम माल्लू**
BARAMIA, Rose Belle
MAURITIUS

अनुक्रमणिका

## दुःखी जीवन

दुःखी कष्टी मन माझे हे
दुःखी कष्टी जीवन माझे हे
श्रम माझे वाया गेले ते रे
हरवले माझे सगळे ते रे
निराश परी न झाले रे
फळआस ही न धरूनी जगले रे
वय माझे हे लहानसे रे
या लोकी येऊन बहु अनुभवले रे
मानवी जन्म न मिळतो सहजी
आहे स्वहत्या ही महा पापी
आस धरूनी पुढे मी जावया
बघत रे देवा तुझ्या चरणा
निशीदिनी प्रार्थितसे तुजला
पावावे केव्हाही एकदा तू मला
विश्वास माझा तुजवर भारी
विसरुनी तू मज न तारी
करूणार्थ माझ्या ऐकावी अहो परमेश्वरा
होईल कदाकाळी मुक्ती माझी तया स्मरणा

**कुमारी देवयानी नाग्या**
Baramia
Rose-Belle
Mauritius

अनुक्रमणिका

## वंदना

मनमुक्त होऊन गाऊ महिमा
सदभावाने तुज परमेश्वरा
सूर मिसळुनी चरणी तुजला
ठेवू माथा श्री गजानना

काय अदभूत माया सौंदर्याची
विकिरलेस तू या विश्वंबरी
प्रेक्षणिय जगी ही ठेवा तुजी
सारे वंदीत तुज सृष्टीस्वरूपी

निळसर डोंगर, मनोहर सागर
निर्मिलेस तू या भूमंडळी
पशू पक्षी मानव हे सारे
प्रभाती गात तुज भूपाळी

शितळ वारा निर्मळ पाणी
जगी तुझ्याच कृपेची छाया
प्रेमभराने गुण गात मनमनी
विसावते हे दीन चरणी तुझ्या

**दशरथ आबा**
Mr. Dasruth ABBA.
Shiwajee Road, Melle Rose
MAURITIUS

अनुक्रमणिका

# आई

बहु क्षमता अन् नम्रता
आई हृदय तुझे
जगी एक तुज माता
मज प्रेमे वाढविले

तुझ्यामुळे जगी सुखी मी
मजवर तुझी ममता अपार
सुंदर, प्रेमळ, निर्मळ , कोमळ
तुच कृपेचा सागर

चित्ताकर्षक स्नेही जननी
मज एक तुच आधार
करुणा, क्षमता, ममता, नम्रता
तुच जीवनाधार

हिम्मत तुझी खडी पहाडी
अखंडित प्रेम तुज हृदई
निर्भय, सगुण, शितळ, गंभीर
तुच एक प्रेमाधार

स्मरण असो सदैव तुजी
घडो सदा कर सेवा तुजी
सतत माथे असो चरणी
तुजवीन जीव निराधार

**दशरथ आबा**
Mr. Dashruth ABBA
Shiwajee Road, Melle Rose
MAURITIUS.

अनुक्रमणिका

## बाळ कौतुके

बाळ जगाचा सुंदर तारा
आई मावळीचा तो हाय वासरा
हासत खुलत त्याचा मुखडा
प्रेम अर्पित जातो बापडा
करा न हो कौतुक त्याचा

त्याचा किलबिल जगा वेगळा
नित्य बागडे आवडे जनाला
आनंदे ऐकू बोबडी भाषा
मनी राहाते एकच आशा
करा न हो कौतुक त्याचा

हात धरून त्याला सावरा
सतत दाखवा सुमार्ग त्याला
निष्पाप अहा कोमल मनाचा
अंतःकरणापासून चांगला
करा ना हो कौतुक त्याचा

पवित्र पाहा स्वरूप त्याचा
मिथ्या नाही बोल त्याचा
धडा हा घ्यावा सर्वांना
तेव्हा करावी त्याची वंदना
करा नाहो कौतुक त्याचा

शिल्प घडतो त्या बाळाचा
वाढत जातो पुतळा त्याचा
अंती दडतो बाळपण त्याचा
वेड लागतो तसा पोराचा
करा ना हौ कौतुक त्याचा


**प्रेमदेव ईट्टू**
Mel Rose, Mte Blanche
HAURITIUS


अनुक्रमणिका

## चालतो मी एकटा

चलातो मी एकटा, हातात घेऊनी सोटा, रात्रंदिवस न खाता पिता
दिवस काय, रात्र काय, जीवन माझे जाते जागता ही जागता.

अंध असल्याने काही दिसत नाही,
तरी आहे भावना मला जगाच्या सौंदर्याची,
मुका असल्याने, ओठ अेकमेकांवर चिकटलेले असतात
पण इतर आवाज कानी माझ्या घुमत असतात.

डोक्यावर दिवे देवाचे, पायांखाली बिकट रस्ता
मनी खेदांचे ओझे घेऊन जातो कुठे कुणास ठाऊक.

वावडणे माझे पाहून सृष्टीस येते रडू
अश्रूमुळे तिच्या, रस्ता माझा होतो मऊ
मऊ रस्त्यामुळे भार माझा होतो हलका
देवास येते दया, करेना तो मला बोलका.

आहे शरीर माझे रोगयुक्त
जगाला नाही मी उपयुक्त
न बोलता येते, न आहेत नयन
करू कसे देवा तुझे मी पूजन.

इतर प्रेमाने, देवा मी सुद्धा तव भक्त
काही नको मला फुटू दे वाचा फक्त
हृदयात स्थापून तुझी मी मूर्ति
निशिदिनी ओवाळेन तुझी आरती.

**—राजेन रामा**
ST. JULIAN D HOTMAN
MAURITIUS

अनुक्रमणिका

## माझा देश

देश माझा हिंद महासागराचा तारा
शोभे इथे रम्य वनश्री अवधे मास बारा ॥

धर्म संस्कृति विविध मानिती परि राष्ट्र एक
खांद्यास भिडवुनी खांदा चालती जरि भाषा अनेक
इथे नांदतो मनो मनातून प्रेमाचा अतिरेक
देश माझा स्वावलंबी स्वतंत्र देश प्यारा ॥ १ ॥

कोणी म्हणती नंदनवन हे अवघ्या भूमीचे
कुणी म्हणती डुलते पंकज हिंदमहासागराचे
कोणी म्हणती आशास्थान हे शांती समतेचे
कोण म्हणे ही असत्यवाणी पुसा साक्षी सागरा ॥ २ ॥

निसर्ग रम्य सौंदर्याने आनंदते मन
सुखे लुटण्या दुरून येती इथे बहुजन
कौतुक करिते सारी दुनिया वाटे हा अभिमान
देशी माझ्या सदैव वाहो स्वातंत्र्याचा वारा ॥ ३ ॥

**सदानंद भिवाजी**

अनुक्रमणिका

## इथे पाहिला इतिहास

इथुन पाहिला इतिहास मॉरिशस देशाचा
रक्ति प्रवाह वाहिला जिथे वडिलजनांचा

मानव आकृति घेऊन इथेच मी
पुनः पुनः जन्म धेतला चिरकालाने
वेगवेगळी नावे धारण केली इथेच मी
मुंडा गिरी अजुनि उभा माझ्या साक्षीने
रंग पाहिला इथेच मी बदलत्या वेशांचा
रक्त प्रवाह वाहिला जिथे वडिल जनाचा

बहु पादांचे आघात लागले या अंगाला
मळकट चढले तरी न चढत्या रंगाला
फरके पडले चाबकाचे माझ्या पाठीवर
दुर्लक्ष केले धतिकाने क्षमिकाच्या हाला वर
आजही दिसतो घाव तजेला तो फरक्याचा
रक्त प्रवाह वाहिला जिथे दलित जनांचा
किती घडामोडी घडल्या या भूमीवर
चढण उतार पाहिली राजनीतीच्या सांचावर
पाहिला रक्त घाम आवलांचा पाझरताना
शीलाचा अपमान पाहुनी नभास पाहिले रडताना
पाहिला रनांगण इथेच संस्कृतीच्या संघर्षाचा
इथून पाहिला इतिहास मॉरिशस देशाचा

**धर्मा गोविन्दा प्रभाकर**

अनुक्रमणिका

## हे इंदिरा गांधी तुला माझा लाख प्रणाम

हे इंदिरा गांधी तुला माझा लाख प्रणाम
तू मानवतेसाठी दिलास आपला प्राण
ही तुझी कर्म कहाणी राहील जगती प्रमाण
नित दाखवील नरा नवमार्ग—नवा धाम ॥ १ ॥

तू नेहरू सुकुमारी होतीस ज्योती परी
कशी तेवत होतीस नित तिमीराकाशी
दाही दिशा प्रकाशित होतीस अमर ज्योती
देत होतीस निशिदिनी सकला दिव्यप्रकाश ॥ २ ॥

बघ परी दुष्ट मानवाच्या क्रूर हस्ते
तू बळी पडलीस मानसप्रिय दर्शिनी
होतीस जवाहरची एकूलती रत्नमणी
तू गांधी कुळास अमर करूनी गेलीस ॥ ३ ॥

तुझी उज्ज्वल कांती होती भारतमाता
तुझा उज्ज्वल भाला होता जगजनिता
मानव धर्मदायिनी होतीस तू विश्वमाता
तृतिय दुनियेची होतीस तू साक्षातमाता ॥ ४ ॥

नित्त ध्यानी-मनी-हृदयी विश्वशांतता
सदा तिमिरातुनी नवाशेचा प्रकाश फाकता
भारत जननी दाखवी इतरां धर्मवाटा
होती मनी तव संकल्प विश्वबंधुत्वांचा ॥ ५ ॥

नित्यकर्मास्तव तू निघालीस जावया
परी काल दारी पाहा तुवा उभा ठाकला
जीर्ण केली थोर कुडी विषारी आठ गोळ्या
इंदिरा इंद्रज्योती प्रकाशुनी हाय मावळल्या ॥ ६ ॥

आजन्म ज्यांनी वेचल्या सर्वस्व आपल्या
ज्यांनी प्रस्थापिली मानवधर्म कळवावया
श्रमश्वेदबिंदु दीनाच्या ध्यानी-मनी पटविल्या
त्या अमरज्योतीस परी नरदानवाने मावळल्या ॥ ७ ॥

देशबांधवास देऊनी स्वाभिमानाचा ध्वजा
स्वावलंबन केलीस आपली भारतीय प्रजा

अनुक्रमणिका

दाखविलीस श्रमकष्ठाच्या त्या मंगळ दिशा
जागवुनि देशाप्रती नवीन भारताची नवआशा ॥ ८ ॥

होतीस विश्वजनिता दीनजनांची माता
जगातुनि गेलीस नाव मात्र राहिले आता
देवा दुर्लभ मिळणे तिजसम पुन्हा आता
आज संपूर्ण मानवधर्म दुःखसागरी बुडाला ॥ ९ ॥

तू शांती सामराज्य दूतदायिनी
नतमस्तक होतो आज तव चरणी
तुझे थोर शिकवण उरो ममहृदयी
धर्मवाटेवरी मम होवो नीत तव स्मृति ॥ १० ॥

मानवाच्या इतिहासात अप्रतिम राहशील
मानवाच्या इतिहासाला नवी दिशा देशील
तव रक्ताने पेटविला नवजागृतीचा मसाल
नवा प्रकाश दे माते तव बलिदानातून सकल ॥ ११ ॥

तुझे रक्त देईल जगाला नवीन आशा
रंजल्या गांजल्या दीनांना देईल दिलाशा
तुझे गुणगुणा नीत करतील दाही दिशा
राहीशील अमर येईल पुर्वेला जोपर्यंत उषा ॥ १२ ॥

**देवजी पादिया चंदावरकर**

अनुक्रमणिका